॥ ... शरणम् ॥

म. ग्रं. सं. ठाणे
विषय भू प्रवास
क्र. ८(२)



# लक्ष लक्ष पा[illegible]ळांची कथा

REFBK-0025252

श्री स्वामी समर्थ परिवार प्रक

लेखक प. पू. मुकुंदराव (नाना) करंद

। सकल जन हिताय ।

श्रीस्वामीसमर्थ परिवार प्रकाशन
शिवकृपा बिल्डिंग नं. २, विष्णुनगर
ठाणे ४०० ६०२

# लक्ष लक्ष पावलांची कथा

लेखक : प. पू. मुकुंदराव (नाना) करंदीकर
(संस्थापक श्रीस्वामीसमर्थ परिवार)

REFBK-0025252

मूल्य रु. वीस मात्र

**मुद्रक :**
शं. द. घाटपांडे
जयभारत प्रिंटर्स अॅण्ड स्टेशनर्स
नाईक वाडी, ठाणे ४०० ६०२.

**प्रकाशक :**
श्रीस्वामीसमर्थ परिवार,
द्वारा मनोरमा मुकुंदराव (नाना) करंदीकर
शिवकृपा बिल्डिंग नं. २,
विष्णुनगर, ठाणे ४००६०२.

**मूल्य :**
रुपये वीस मात्र

श्री स्वामीसमर्थ

२५२५५
१६।०१८०



प. पू. मुकुंदराव (नाना) करंदीकर

# प्रस्तावना

सध्याच्या युगात वाहनांची सोय असताना पायी यात्रेचं प्रयोजन काय ? असा प्रश्न कोणाच्याही मनात सहज येईल, परंतु साक्षात स्वामींचीच तशी इच्छा होती. लेखकाची अक्कलकोटची पदयात्रा ही स्वामींनीच करवून घेतली होती. शिवाय अष्टविनायक आणि अकरा मारुती हा पायी प्रवास लेखकानं त्या अगोदर केला होता. त्यामुळे पदयात्रा म्हणजे काही नवीन गोष्ट नव्हती. ' ठाणे ते जगन्नाथपुरी ' एवढा लांबचा पल्ला, परंतु त्याचीही काळजी स्वामींनीच उचलली होती. स्वामींची प्रेरणा, साक्षात् स्वामी पाठीशी असता मी आणि घरच्या सर्व मंडळींनी एवढया लांबच्या प्रवासाला अनुमती देणं हेच योग्य होतं. देव आणि दैव यांचीही साथ होती. त्यामुळे चिंतेचं कुठल्याही प्रकारचं काहीच कारण नव्हतं.

प्रत्येक भारतीयानं तीर्थक्षेत्रांची यात्रा करावी हे एक सुंदर स्वप्नं उराशी बाळगलेलं असतं आणि त्याप्रमाणे प्रत्येकजण आपापल्या परीनं स्वप्नपूर्तीचा यत्न करतो. तीर्थाटनाच्या निमित्ताने देशाटनही होते आणि ज्या गोष्टी एरवी कधीच समजल्या नसत्या त्या पायी प्रवासानेच समजून येतात. ठिकठिकाणी मनुष्यरुपात वसत असलेला देव दृष्टीस पडतो. रम्य वनश्रीकडे लक्ष वेधले की जगत्व्यापी परमेश्वराच्या रुपाचा मोह पडतो तर कोठे देशप्रेमाने भारलेल्या एखाद्या जवानाचे किंवा त्याच्या कुटुंबियांचे उत्कट प्रेम लक्ष वेधून घेते आणि अशावेळी खरा कमा देशभक्त असतो याची प्रचिती येते. एखाद्या शेतात एकांतातही अशीच सुखद अनुभूती येते. भारत भूचे दर्शन अगदी जवळून घेता येते. आणि एरव्ही असलेले साधे नाते अधिक जवळचे होते. संतांच्या अनेक ओव्या वाचल्या तरी ' एकतरी ओवी अनुभवावी ' असे म्हणतात

आयुष्यात एकदा तरी, अगदी छोटीशी का होईना पदयात्रा केल्यास कोणालाही संस्मरणीय असा अनुभव नक्कीच येईल.

श्रीमद् आद्य शंकराचार्य यांनी अगदी लहान वयात अखंड भारताची पदयात्रा केली आणि चारही दिशांना हिंदू धर्माची उज्वल ध्वजा फडकावली त्यानंतर पुष्कळ संतानीही त्यांचाच आदर्श अनुसरून हाच मार्ग पत्करला. पुरातनकाळी सर्वच माणसे पायी यात्रा करीत असत. अगदी अलीकडील संत रामदासांनीसुद्धा पायी भ्रमण करून देशाची स्थिती जवळून पाहिली आणि त्यामुळच त्यांच्या लिखाणाला उदात्त वास्तवतेचा स्पर्श झालेला आहे आणि त्यात एक प्रकारचा गाढ आत्मविश्वास आहे.

ठाणे–भिवंडी–कसारा–नासिक–मालेगाव-धुळे-मलकापूर - शेगाव कारंजा-अमरावती-नागपूर-भंडारा–भिलाई-रायपूर-सरायपल्ली-संबळपूर कटक-भुवनेश्वर-जगन्नाथपुरी.. असा हा या आनंदयात्रेचा १८७५ कि. मी. चा मार्ग होता या प्रदीर्घ प्रवासात पावलागणिक राम नाम मुखात होतं तसच प्रत्यक्ष स्वामी तर बरोबर होतेच. एकट्याने प्रवास केला म्हणून भीती वाटली नाही, कंटाळा आला नाही की थकवा जाणवला नाही एकेक पाऊल टाकताना उत्साह वाढत होता. सतत एक अपूर्व आनंद मिळत होता. म्हणूनच पदयात्रा ही आनंदयात्रा झाली.

एव्हढ्या मोठ्या यात्रेची फलश्रुती काय ? असा प्रश्न कोणाच्याही मनात उद्भवणं साहजिकच आहे पण आपलं मनोगत . लेखकानं 'लक्ष लक्ष पावलांची कथा' या आपल्या पुस्तकात अत्यंत उद्बोधकपणे शेवटी स्पष्ट केलं आहे पायी यात्रा करणाऱ्यांना या पुस्तकाचा पाथेय म्हणून उपयोग होईल असा विश्वास वाटतो. (ह्यांना) ती. नानांना हे पुस्तक पहायचा योग आला असता तर त्यांना फार समाधान झालं असतं ! परंतु ईश्वरेच्छा बलियसी हेच खरं !

**मनोरमा मु. करंदीकर**

शिवकृपा नं २ दि. १५ एप्रिल १९८४

विष्णुनगर, ठाणे–४०० ६०२

मराठी ग्रं... संग्रहालय ठाणे
६९७ २९२४७ १६३०८
शाखा (स्थळ प्रत)

|| श्रीस्वामीसमर्थ प्रसन्न ||

## पदयात्रा

# || ठाणे ते जगन्नाथपुरी ||

## अध्याय १ ला

**प्रारंभ :** हरि ॐ

माघ शुध्द एकादशीच्या मंगलप्रभाती, स्वामींनी दर्शन दिले आणि म्हणाले ; 'बेटा, जगन्नाथाला चल,' ही सुरवाणी ऐकून मन प्रसन्न झाले. ३ वर्षांपूर्वी अक्कलकोटची पदयात्रा त्यांनीच करवून घेतली. त्या पदयात्रेतील दिव्य अनुभवांची नुसती आठवण झाली तरी मन बहरून येते. आता तर परत पदयात्रा करावयाची या जाणीवेने मनांत जो आनंद कल्लोळ माजला त्याला उपमाच द्यावयाची तर पौर्णिमेला येणाऱ्या समुद्र भरतीचीच देता येईल ! हा आनंद हृदयांत मावेनाच ! ! भोजन-समयी ही शभवार्ता पत्नी आणि पुत्र यांना सांगितली. पत्नीला तर आनंद झालाच–पण इंजिनिअर असलेला मुलगाही म्हणाला, ' नाना, तुम्ही खरंच भाग्यवान आहात ! निसर्गातील आनंद आकंठ प्राशन करता येईल ! ! ' विवाहित कन्यांना ही वार्ता कळताच त्या भेटीस आल्या. जामात आले आणि पांच वर्षांचा नातूही आला. अक्कलकोटच्या पदयात्रेतून परत आल्यावर दाढी वाढली होती. मित्रांनी त्यावेळी काढलेला फोटो–अल्बम्मध्ये होता. अमित या नातवाला ते दाढीवाले नाना फार आवडायचे. कारण त्याला कडेवर घेऊनच फोटो काढला होता. कन्या,

जामात, नातू सारे सुखावले होते. स्वामींची कृपा असल्यावर काळजीचे कारणच काय ?

रात्री मनांत एक विचार आला. विठ्ठलवेडचा तुकारामाला त्याची पत्नी छळत होती तसे जर आपल्या पत्नीने आपणांस छळले असते तर आपणाकडून स्वामीभक्ती झाली असती कां ? पदयात्रा झाल्या असत्या कां ? तुकारामाचे मोठेपण लक्षांत आले ! आपला मार्ग स्वामींनी किती सुगम केला आहे ! !

## ।। पत्नी मनोरमादेवी मनोवृत्तानुसारिणीम् ।।

योगायोग असा की पत्नीचे नांवहीं मनोरमाच ! जीवनांत नेहमी सहाय्यभूत होणारी ! पुत्र तसाच, कन्याही तशाच, जामातही तसे आणि नातवाशी तर अगदी अंतरंगाचे नाते ! स्वामींची लाकडी मूर्ती चौरंगावर मांडून–त्या मूर्तीस रोज दुर्वा वाहतो–गुरुवारी हार घालतो. स्वामींची काय कृपा आहे पहा ! 'अवघाचि संसार सुखाचा, सुखाचा ।।'

पदयात्रेची निश्चिती झाली. तयारी काही करावयाची नव्हती. पदयात्रा करावयाची तेथे तयारी काय करावयाची ! आणि 'जगन्नाथला चल' म्हणजे स्वामी बरोबर आहेतच. वार्ता हळूहळू पसरूं लागली मित्र भेटावयास येऊ लागले. स्वामींचे भक्तही येऊ लागले सर्वांनी बजाविले, 'अक्कलकोटच्या पदयात्रेचे वेळी तुम्ही आम्हाला गुंगारा दिला. यावेळी तसे करूं नका. निरोप देण्यासाठी वेशीपर्यंत तरी आम्हास येऊ द्या.' सर्वांच्या सोयीसाठी–सोमवार दि. ५।३।१९७९ हा प्रयाणाचा दिवस ठरला. मुहूर्त सकाळी ६॥ वाजता.

कुणाला न सांगता जो तो आपल्या कल्पनेप्रमाणे तयारी करीत होता. एका भक्ताने ठाणे ते जगन्नाथपुरी या मार्गाचा नकाशाच काढून आणला. एकाने मार्गावर लागणारी गावे, त्यामधील अंतर याचे कोष्टक आणून दिले, कुणी मार्गावर असणाऱ्या आपल्या नातेवाईकांचे पत्ते आणून दिले. मला कशाचीच गरज नव्हती. पण त्यांचा भाव ओळखून सर्व ठेवून घेतले. पाठीवर घेता येईल एवढेच सामान घ्यावयाचे. बॅटरी, वॉटरबॅग, हाती दंड आणि प्रवासांत लागणारे पैसे ! कुणाच्या आश्रयाला जावयाचे

नाही ! पायी प्रवासी आहे यांस मदत करा म्हणून कुणाचे पत्र घ्यावयाचे नाही. जेथे ब्रह्मांडाचा पिता मजबरोबर आहे तेथे कुणाची शिफारस घ्यावयाची ? माटुंग्याला जाऊन चुलत चुलत्यांना नमस्कार मात्र करुन आलो. पहिल्या पदयात्रेच्या वेळी (अक्कलकोटच्या) सर्व मोठमोठ्या लोकांनी अगदी स्वामींचे भक्त आणि मठांचे ट्रस्टी यांनी देखील मला नाउमेद केले होते. 'अहो आम्ही गाडी देतो, खर्च देतो, अक्कलकोटला जाऊन या. या पदयात्रेच्या जंजाळात कां जाता ? तुम्ही तर संसारी आहांत! प्रवासाच्या सर्व सोयी उपलब्ध असताना ही यातायात कशाला ?' परमेश्वराची भक्ती आत्मसुखासाठी (देहसुखासाठी) करावयाची असते. अशी ज्यांची धारणा ते यापेक्षा दुसरे काय सांगणार ? पण चुलत्यांनी मात्र सांगितले ; 'अरे, अशी प्रेरणा लाखांत एकालाच होते ! तू कसलाही. विचार करू नकोस. त्वरित पदयात्रेला निघ. सर्व चांगले होईल. काही काळजी करूं नकोस.' चुलते रामकृष्ण परमहंस व विवेकानंद यांचे ज्ञानी भक्त होते. ते वेदांत जाणत होते. वेदांत जगत होते. चुलत्यांना नमस्कार केला. त्यांना अपार आनंद झाला. त्यांनी उत्तम आशीर्वाद दिले आणि म्हणाले, 'अरे, तू तर स्वामींचा फारच लाडका दिसतोस ! !' माझ्या मनांत एक विचार आला.

**॥ जो आवडतो सर्वांना तोच आवडे देवाला कां ॥**

**॥ जो आवडतो देवाला तोच आवडे सर्वांना ॥**

आपले आई–वडिल आणि सासरे हयात असते तर ! ! त्यांना अस्मान् ठेंगणे झाले असते ! ! कारण एकटयाने ठाणे ते जगन्नाथपुरी पदयात्रा करणे (प्रवास करणे नव्हे) म्हणजे केवळ देवकृपाच ! परमेश्वराची कृपा लाभणे यापरते भाग्य नाही !

५ मार्च १९७९ ला सकाळी निरोप देण्यासाठी सर्व सुहृद, आप्त येणार त्यांच्याशी काय बोलावे. आपल्याला बोलता येणार नाही. एक काव्यच तयार झाले. डॉ. ओक, फडकेवाडी, गिरगाव यांनी तो निरोप गावा असे ठरले. पण ४ तारखेला दुपारी निरोप आला डॉ. ओकांना बराच ताप आहे तेव्हा ते उद्या सकाळी येऊ शकणार नाहीत !

५ मार्चला सकाळी ४॥। ला घरच्या देवास व स्वामींच्या फोटोस नमस्कार करून निघालो. बरोबर सारे आप्त व काही मित्र होते. जणू प्रभात फेरीच ।। श्री स्वामीसमर्थ जय जय स्वामीसमर्थ ।। हे भजन म्हणत श्री कौपिनेश्वराच्या मंदिरात आलो. तेथेच सर्वजण जमणार होते. श्री कौपीनेश्वराला दुधाचा अभिषेक केला ।। ॐ त्र्यंबकं यजामहे ।। ह्या मंत्राने पूजा केली. चिमाजी आप्पांनी याच कौपिनेश्वराचे दर्शन घेऊन प्रतिज्ञा केली होती । वसईचा किल्ला जिंकीनच ! या आठवणीने आत्मविश्वास दुणावला. सर्व देवतांचे दर्शन घेऊन तेथील दत्तमंदिरात आलो. तेथे स्वामींचा फोटो आहे. दत्ताला व स्वामींना साष्टांग नमस्कार घातला, ७०।७५ मित्र-माता-भगिनी तेथे वाट पहात बसल्या होत्या. ताप असलेले डॉ. ओकही आले. ते म्हणाले—मला रहावेनाच ! सर्वांना वंदन केले. सर्वांनी स्वामींची प्रार्थना केली. आतापर्यंत सर्वांच्या मनात उत्सुकता होती ; पण आता विरहाचा भाव दाटला होता ; पापण्यांचा बांध फोडून अश्रू ओघळू लागले ! पण हे अश्रू कौतुकाचे होते. प्रेमाचे होते. वात्सल्याचे होते. या वातावरणांतच डॉ. ओकांनी निरोपाचे गीत अगदी रागदारीत म्हटले मी रचलेले निरोपाचे गीत म्हणजे माझा सर्वांना नमस्कार.

## ।। नमस्कार सर्वांप्रति ।।

दही द्या हो हातावरी वात्सल्य ते खरोखरी
मधुगंध त्याचा नित्य दरवळो मार्गावरी ।।१।।

संकल्पाच्या पूर्ततेची मज असे खात्री
म्हणुनीया नसावे ते संभ्रमाचे अश्रु नेत्री ।।२।।

समर्थांचा असे पुत्र होईल कां कधी त्रस्त ?
विश्वासुनी याच भावे मज तुम्ही निरोपावे ।।३।।
देवाच्या त्या दर्शनाला देह ऐसा झिजवावा
मन बुद्धी आणि आत्मा यांचा पूर्ण लय व्हावा ।।४

हृदयांच्या पालखीत बैसविले स्वामीनाथ
पालखी ती घेऊनिया चाललो मी आनंदात ॥५॥

वैखरीत रामनाम सर्वांगी तो सीताराम
पुढे चालले लक्ष्मण मागती तो हनुमान ॥६॥

येईल तो जगन्नाथ सोडूनी त्या आसनाला
भेटुनीया वाटेमध्ये नेईल तो नगरीला ॥७॥

भाग्य ऐसे लाभे कुणा स्वामी देती स्वये मला
उध्दवाच्या देही जैसा एकरुप कृष्ण झाला ॥८॥

ईश्वराच्या भेटीसाठी पाऊलांचा खेळ चाले
पाऊलांच्या संगे माझ्या आनंदाचा बाग फुले ॥९॥

पाठवीन वायुसंगे सुगंध तो तुम्हांकडे
प्रकाशाचा पुंजा तैसा येईलही तुम्हाकडे ॥१०॥

सदा असा आनंदात तृप्त तैसे मानसांत
घेतो आता निरोप हा करुनिया दंडवत ॥११॥

**श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम श्रीराम**

कमालीची शांतता पसरली विरहाचे अश्रु संपले
आता मुग्धता आणि कौतुकाचे भाव उमटले.

—सर्वांना नमस्कार केला—

जाण्यासाठी उठलो आणि एका मित्राने खड्या आवाजात गर्जना केलीं.

॥ समर्थांचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळी कोण आहे ॥

साऱ्यांच्या मनातील भीतीच भ्यायली, दूर पळून गेली. साऱ्यांना आत्मविश्वास वाटला. स्वामींच्या फोटोला नि श्रीदत्तात्रयाला वंदन केले—

आणि श्रीराम म्हणत पहिले पाऊल टाकले. स्वामींच्या आज्ञेनुसारच हे केले. हृदयांत स्वामी–वैखरीत श्रीराम–एकच परमेश्वर दोन रुपांत सगळे मागोमाग येत होते–वेशीपर्यंत येण्यास अनुमती होती. वेशीवर सर्वांना वंदन केले–त्यांनी प्रतिवंदन केले. मी पूर्वेकडे तोंड केले. सूर्याला नमस्कार केला–आणि म्हणालो–' नारायणा, आता तर तुझेच तेज मला साथ देणार आहे.' भिवंडीच्या मार्गावर पाऊले पडूं लागली.

**श्रीराम ! श्रीराम ! श्रीराम ! श्रीराम !**

# अध्याय २ रा

ठाणे भिवंडी रस्ता-म्हणजे वाहतूक फार असलेला रस्ता ! *माणसानेच जपून चालले पाहिजे ! नाहीतरी यांत्रिक युगात मानवाला* किड्यामुंगीचीच किंमत आलेली आहे. ११।। वाजता धामणकर रस्त्यावर आलो. समोर एक लहानसे मंदिर होते. खाजगी मालकीचे मंदिर. तेथे सरळ गेलो. श्रीसाईबाबांचे ते मंदिर होते. तेथे विश्रांती घेतली. वरोबर बेसनाचे लाडू होते, ते खाल्ले. हे लाडू तरी कसे आले पहा. दि. ३ व ४ ला घरांत फार धांदल होती. भेटीसाठी सारखे लोक येत होते. पत्नीला उसंत मिळत नव्हती तिच्या मनात इच्छा होती की वरोबर बेसनाचे लाडू करुन द्यावेत पण तिला वेळच मिळाला नाही. स्वामींनी एका भगिनीला प्रेरणा दिली. जगदंबेने प्रेरणा दिली व त्या भगिनीने लाडू करुन सकाळी आणले आणि मला दिले. पत्नीची एक इच्छा पूर्ण झाली.

त्या मंदिराचे मालक डॉ आचार्य यांनी जेवण्याचा आग्रह केला. पण लाडवानी पोट भरले होते. म्हणून पपई फक्त खाल्ली. ३ वाजता दूध घेतले आणि पुढे निघालो. S. T. स्टॅण्डजवळ श्री. वैद्य कुटुंब व श्री जोगळेकर वाट पहात होते. ते भेटले त्यांनी घरी येण्याचा फार आग्रह केला मी नकार दिला कारण असे सत्कार घेत जाणे योग्य नव्हे. सारी ओढ जगन्नाथाकडे हवी. सायंकाळी एक खेडेगाव लागले. मारुती मंदिरात खांद्यावरची पिशवी उतरवून मारुतीरायास नमस्कार केला तोच स्वामींनी आदेश दिला—मुक्काम शेतात करावा. वॉटरबॅगमध्ये पाणी भरुन घेतले. गांवावाहेर १।।–२ मैल आलो व एका शेतात झोपलो. थकलो असल्यामुळे झोप केव्हा लागली हे कळलेच नाही प्रवासात श्रीराम श्रीराम सतत म्हणत होतो. मला वाटते झोपेतही तो जप आपोआप होत असावा.

पहाटे ४ ला उठून शुचिर्भूत होऊन स्वामींची प्रार्थना करुन पांच वाजता श्रीराम म्हणत पहिले पाऊल टाकावयाचे असे ठरविले. पंचपंच उषःकाली मार्च-एप्रिल मे मध्ये हवा थंड असते, उषःकाली सूर्याचे दर्शन रमणीय असते. पवित्र असते. अमर भूपाळीतील काव्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो. प्रसन्नता म्हणजे काय हे शब्दांत कितीही अलंकारिक भाषेत सांगितले तरी प्रत्यक्ष अनुभव यांत काही न्यारीच रमणीयता आहे !

झुळझुळ वाहणाऱ्या वायुलहरी, त्या वायुलहरींमुळे वृक्षराजींच्या पानांची होणारी हालचाल—उषःकाली आकांशाचे सौंदर्य—निरनिराळया रंगछटा यामुळे आगळा आनंद प्राप्त होतो. इतक्या लवकर रस्त्यावरुन मी एकटाच चाललेला असतो आपणांस उषादेवी हा सारा नजराणा अर्पण करीत आहे आणि आपण या जगाचे सम्राट आहोत असा गर्वही मनाला वाटतो, त्यामुळे चालण्यांत एक प्रकारची ऐट येते—पाऊले रुबाबात टाकली जातात.

७॥—८ वाजता कोणत्यातरी हॉटेलात चहा घेतला आणि तसाच पुढे निघालो. पडघे मागे टाकले. ११।—१२ च्या सुमारास—रस्त्यांत घेतलेली पुरीभाजी खाल्ली आणि एका वडाच्या आणि आंब्याच्या झाडाखाली विश्रांतीसाठी पहुडलो . मी झोपलो पण सूर्य चालतच होता. ऊन अंगावर आले तरी मला पत्ता नव्हता. एक शेतकरी आला आणि त्याने तेथून मला उठविले. दुसऱ्या झाडाखाली घेऊन गेला आणि म्हणाला, ‘ तुमची झोप आहे का काय आहे ! एक गाय तुमच्या अंगावर येऊन उभी होती म्हणून तुम्हाला ऊन लागत नव्हते. पण—ते आंब्याचे झाड आतून पेटविलेले आहे. ते धगधगते आहे, अंगावर पडले असते तर ! ’ आता त्या शेतकऱ्याचे आभार कसे मानावे ! तोच एक सायकलस्वार कलिंगडे विकण्यास चालला होता, त्याला थांबविले. चार फोडी घेतल्या, २ शेतकऱ्याला दिल्या, २ मी खाल्ल्या. फारच चविष्ट फळ होते. शेतकऱ्याने थोडी विचारपूस केली आणि तो जाण्यासाठी उठला आणि समोरचे आंब्याचे झाड कोसळले. पूर्वी ज्या जागेवर मी झोपलो होतो तेथेच ते कोसळले, शेतकऱ्याचे शतशः आभार मानले. तो निघून गेला

आणि ती गाय कुठे गेली ? मला ऊन लागू नये म्हणून सावली धरुन ती उभी होती, का हे जळके झाड माझ्या अंगावर पडू नये म्हणून ती उभी होती ! ती गाय होती का माझी आई होती ! का साक्षात् गुरु माऊली स्वामी होते ? देव दयाशील आहे, कृपाघन आहे, भक्तांचे रक्षण करणारा निश्चित आहे.

थोडे ऊन कमी झाल्यावर चालू लागलो, कांदळगांवाचे बाहेर एका शेतात रात्री मुक्काम केला. रस्त्यांत स्वच्छ पाणी भरुन घेणे. चांगल्या हॉटेलमधून पुरीभाजी बांधून घेणे अशी व्यवस्था करुन घेतली होती. त्याचा दरदिवशी परत उल्लेख नकोच. काही लोकांचा नेमका तोच प्रश्न असतो. त्यांचे लक्ष जगन्नाथाकडे नसते तर व्यवहाराकडेच असते.

कांदळहून पहाटे निघालो-वासिंद-आसनगांव असा प्रवास झाला. आसानगांवला न्याहारी केली, रेल्वे स्टेशनचे जवळ मारुतीचे उत्तम मंदिर आहे, तेथे विश्रांती घेतली. चालण्याची संवय नसल्यामुळे आता पाय सुजले होते, दुखत होते-बूट लागले होते. साऱ्या वेदना सहन करीत शहापूर गावांत आलो. श्री. भिडे यांचेकडे जावयाचेच होते. ते विंचू व साप यांचे विष उतरवितात. पाय शेकले, Band Aid च्या पट्ट्या आणल्या, शहापूरला मुक्काम केला.

दुसरे दिवशी शहापूर ते खर्डी प्रवास. आता पाय दुखणे कमी झाले होते. वाटेत आटगाव येथे एका व्यक्तीस भेटावयाचे होते. भेटलो पण वाईट वाटले. अध्यात्ममार्गास लागून माणसे जीवन बरबाद कसे करून घेतात याचा नमुना पहावयास मिळाला. वास्तविक अध्यात्म म्हणजे आनंद ! पण काही लोकांना गुरु असे भेटतात की ते सारे जीवन उध्वस्त करतात, शिष्याचेही नशीब !! खर्डीची हवा उत्तम आहे. खर्डी ते कसारा–वेशीपाशीच धावडोबाचे मंदिर आहे तेथे स्नान वगैरे केले. अगदी शांत वातावरण आहे, पत्रलेखन केले. विश्रांती घेतली. सायंकाळी कसारा गावाचे बाहेर येऊन झोपलो, हवा अगदी थंड आहे.

आज कसारा ते इगतपुरी प्रवास करायचा म्हणून उजाडल्यावर निघालो. न्याहारी करूनच निघालो. आता हा घाट फार उंच आहे.

दुतर्फा पळस, करवंद, आंबा याचीं झाडे विपुल आहेत. हा थळघाट खरोखरच रम्य आहे. पण उंचही फार आहे रेल्वे गाडीसही २ इंजिने लावावी लागतात. दमछाक झाली होती. विश्रांती घेत घेत पुढे चाललो होतो. अनेक कारवाल्यानी लिफ्ट देण्याची तयारी दाखविली. २ बसेसही थांबल्या पण मी साफ नकार दिला. आता जवळचे पाणी संपले. चढामुळे चालून तहान लागत होती. शेवटी चिंचेचा पाला तोडावा–खावा–खात खात चालावे. पण हा उपाय तरी तोटकाच होता. शेवटी दमून भागून विश्रांतीसाठी बसलो. अद्याप ४ मैल तरी घाट चढावयाचा होता. पदयात्रा अर्धवट सोडावी लागते की काय हा विचारही डोकावून गेला! निराशा कळसाला पोहचली ! मग स्वामीचे स्मरण अगदी आर्ततेने केले ! !

आणि प्रत्यक्ष स्वामी समोर उभे ! त्यानी खालील मत्र ११ वेळा माझेकडून म्हणून घेतला–

॥ ॐ ऱ्हां ऱ्हीं ऱ्हू ऱ्हैं ऱ्हौं ऱ्हं ऱ्हः ॐ ॥

भिऊ नकोस असे सांगितले आणि मी उठून चालू लागलो. सारा चढ चढून घाटणदेवीला आलो. भर दुपारी १ ते २॥ प्रवास झाला. देवीला नमस्कार केला. विहीरीचे पाणी काढले. घोट घोट प्यायलो. श्रमपरिहार झाला.

पुढे इगतपुरी, घोटी, माणिकखांब–वडीवऱ्हे मग वडीवऱ्हे ते नासिक. नासिकला काही लोकांच्या घरच्या समस्या होत्या. त्यांच्या भेटी घेतल्या. नासिकहून निघताना गोळे कॉलनीत श्री गजानन महाराज शेगांव यांच्या पादुकांचे एक स्थान आहे. मला वाटते–त्यांचे नाव प्रधान असावे. पादुकांचे दर्शन घ्यावे असे वाटले कारण श्री गजानन महाराजांची मजवर कृपा आहे. श्री साईबाबांची तशीच कृपा आहे. श्री गोंदवलेकर महाराजांचीही कृपा आहे. कारण मी स्वामींचा आहे. पादुकांचे दर्शन घेताना १५ । २० मिनिटे समाधीच लागली. तेथे १५ । २० भक्त 'गजानन विजय' या ग्रथाचे पारायण करीत होते. त्या सर्वांनी औक्षण केले. ताजे ताक घेतले आणि पादत्राणे घालू लागलो

तोच घाईघाईने ताई पुढे आल्या—त्यांनी परत आंत बोलाविले—आणि श्रीगजानन महाराजांच्या पादुकांवर घालण्यासाठी जी कोशाची शाल आणली होती ती माझे अंगावर घातली 'श्री गजानन महाराजांच्या इच्छेनुसार मी ही शाल देत आहे' असे त्या म्हणाल्या. श्री गजानन महाराजांचा प्रसाद घेताना आनंद झाला. डॉ. करमरकर यांचेकडे जेवण करून नासिकचा निरोप घेतला. डॉ. करमरकर यांनी कसे शिक्षण घेतले हे मला माहित आहे. मेहनत करून—वाटेल ती सेवा करून काशीविश्व विद्यालयातून आयुर्वेदाचे शिक्षण पूर्ण केले. जिद्दीने पुरे केले. अशी स्वावलंबी माणसे मला आवडतात. कुळाचा उत्कर्ष अशा व्यक्तींमुळेच होतो.

नासिक ते ओझर प्रवास केला. ओझरच्या बाहेरच शेतांत झोपलो.

# अध्याय ३ रा

ओझरहून ठीक ५-१० ला निघालो. मिग कारखान्यातील दिव्यांची सरबत्ती पहात चाललो होतो. प्रभातीचे वाऱ्याचे कूजन चालू होते. माझे श्रीराम श्रीराम असे कूजन चालू होते. पिंपळगाव येथे पोस्टात जाऊन C/o पोस्टमास्तर असे माझे टपाल घेतले. ६ वर्षाचा नातू चि. अमित याचे आणि सौभाग्यवतीचे पत्र मिळाले. आनंद वाटला. माझ्या हृदयात स्वामी होते- तर घरी स्वामींनी प्रगट होऊन सौभाग्यवतीस सांगितले- 'भिऊ नकोस- मी येथेच आहे- त्याची काळजी करू नकोस. त्याची पदयात्रा पूर्ण होईल.'

वाचकांच्या मनात शंका येईल की स्वामी असे कसे प्रगट होतात. असे कसे बोलतात ? शंका अगदी बरोबर आहे. याबद्दल शास्त्रीय संशोधन व्हावे व त्यासाठी अनन्य निष्ठा आणि विदेही होणे हेच एक साधन आहे. या विषयाची चर्चा करीत बसणे हा या ग्रंथाचा विषय नाही. आज T. V.चे संशोधन झाले आहे. तसेच या अद्‌भुत शक्तीचे आहे. संशोधकाला तशी तळमळ मात्र हवी. पिंपळगाव पार करून- चांदवड मार्गाला लागलो. उंडारे येथे भगभगलेले वातावरण- ते पार करून गावाबाहेर शेतात येऊन झोपलो. आजचा दिवस सौ. ताई प्रधान (नाशिक) यांनी बरोबर दिलेल्या २ लाडूंवर काढला. या दिवशी होळी होती. दुसरे दिवशी सकाळी चहाही मिळेना. दूध खेडयात नाहीच. सोग्रस गाव लागले. शिवाजी गांगुर्डे ही व्यक्ती समोर दिसली. त्यांनी एकदम बोलण्यास सुरुवातच केली. तेथेच त्यांचे घर होते. त्यानी आग्रहाने घरी नेले आणि समोर पुरणाची पोळी- तूप ठेवले- पोळी इतकी मोठी होती की मी फक्त अर्धीच घेतली. वर दुधाचा आग्रह. शिवाय निघताना त्याने २ पोळया बांधून दिल्या. त्यांचे आभार मानले. काल पोट रिकामे, आज पूर्ण भरलेले. आता मंगरूळ लागले. येथे गुरुद्वारा आहे. ग्यानजी हरबानसिंग यांनी स्वागत चांगले केले. पुढे चांदवडचे जैन

मंदिर व महादेवाचे मंदिर पाहिले. चांदवडचा घाट व राहुडचा घाट पार करून रात्रीचा मुक्काम केला. सायंकाळी राहुडचा घाट ओलांडताना मोठे समाधान लाभले.

राहुडघाट ते मालेगांव रस्त्यात सौंदणे येथे श्री. निवाशेट कासार या देवभक्त गृहस्थाची योगायोगाने भेट झाली. शिऱ्याचा पाहुणचार झाला. मालेगाव पोस्टातून पत्रे घेतली. डॉ. भातखंडे व सौभाग्यवतीचे पत्र होते. कुशल वृत्त कळले. मालेगावच्या वस्तीबद्दल मी काय सांगावे ! मालेगाव पार करून एका शेतात येऊन झोपलो.

मालेगाव ते पुसेपाडा (आर्वीजवळ) या मार्गात देवारपाडे (पोस्ट–झोडगे) येथे टुमदार दत्तमंदिर आहे. आसपास फुलवेलींची बाग आहे. येथे मन रमले. वेली, सुकुमार फुले यांना पाहून आनंद झाला नाही तर तो माणूस नव्हेच ! तेथे बसून ध्यान लावले. सायंकाळी पुसेपाडा. गिरणेचा काठ पूर्वी याला मित्रनगर म्हणत. एक कलाकार व्यक्ती, श्रीमंत व्यक्ती पण व्यसनाधीन झाल्यामुळे सर्व काही नष्ट झाले. त्या व्यक्तीबरोबर लहानपणी क्रिकेट खेळलेलो, म्हणून जास्त वाईट वाटले. श्रीमंती म्हणजे दुर्गुणांचे माहेर ! श्रीमंतीबरोबर सत्संग असला तरच माणूस तरतो. श्रीमंतीबरोबर बुद्धी, मनोवृत्ती चांगली असेल तरच जीवन सुखी होते. नुसती श्रीमंती म्हणजे अध:पात !

१८ मार्च पुसेपाडा ते धुळे. आर्वीनंतर लळिंगचा घाट फार सुरेख आहे. या घाटात हिरवळ आहे. येथे मेंढ्या पाळल्या जातात. लोकरीच्या कारखानदारांचे Farms येथे आहेत. मेंढ्यांची उत्तम व्यवस्था येथे आहे. हिरवळीवर बसावे. झुळझुळ वायुलहरींनी अंग मोहरते. हा एकांत मोठा बहरीचा ! काव्य स्फुरते ! आणि दुसरे एक समाधान म्हणजे दि. १९ चे आत आपण Time Table प्रमाणे धुळ्यास निश्चित पोहचतो आहोत त्याचे हे समाधान का ?

धुळ्यास एक रजपूत गृहस्थ आहेत. ते स्वामीभक्त आहेत. त्यांच्या मुलीचा विवाह मी सांगितल्याप्रमाणे ठरला. ते निमंत्रण करण्यास खास ठाण्यास आले होते. माझे तर पदयात्रेचे ठरले होते. लग्नाच्यावेळी आशीर्वाद देण्यासाठी मी हजर असलेच पाहिजे असा त्यांचा ठाम

निश्चय. मी येईन तोच मुहुर्त ! त्यांची स्वामींवरील निष्ठा लक्षात घेऊन त्यांना सांगितले दि. १९ गोरज मुहूर्त ठरवा आणि त्याप्रमाणे त्यांनी मुहुर्त ठरविला आणि मी निश्चितपणे दि. १९ ला उपस्थित राहू शकतो. दि. १८ लाच दुपारी धुळयास पोहोचलो. श्री. गुलाबसिंग गिरासे यांना निरोप पाठविला. श्री. गोरवाडकर, थोरात, कणेकर या न्यायाधीशांच्या भेटी झाल्या. श्री. चौधरी, पटवारी, सुराणा, किशोर, राजाभाऊ आदि स्वामीभक्तांच्या घरी जाणे झाले. शर्मा, श्राफ वकील अशी कितीतरी घरे माझ्या ममतेची होती. दि. १९ ला श्री. गुलाबसिंग गिरासे यांच्या कन्येचा विवाह संपन्न झाला. तिला आशीर्वाद दिला. एक मानसिक समाधान सर्वांनाच लाभले.

दि. २० ला सकाळी निघण्यापूर्वी एक वृद्ध माता भेटली. तिने दूध दिले आणि हातात काही भेट देऊ लागली. मी हात मागे घेतला. पण त्या मातेचा आग्रह जबरदस्त होता. आवाजात हुकमत होती. तिने सांगितले की भेट हातात घ्या. मग ही भेट काय आहे हे सांगते. मी त्या मातेच्या भेटीचा स्वीकार केला. ते एक उत्तम बॉलपेन होते. तिने सांगितले की आता प्रवासातील सारी पत्रे याच बॉलपेनने लिहा म्हणजे ही भेट सदैव आपल्या हातात राहील. ही भावना मी जपली, वाटेत सारी पत्रे त्याच बॉलपेनने लिहिली ! ७५।८० वर्षाच्या वृद्ध मातेची ही भावना किती मनोज्ञ होती ! !

धुळयाची बरीच मंडळी वेशीपर्यंत आली होती. पुढे फागण्यापर्यंत १०।१२ जण आले. श्री. शर्मा गुरुजींनी- फागण्याचा कार्यक्रम ठरविला. या फागणे गावाला दुसरी आळंदी म्हणतात. कै. पूजनीय सोनोपंत दांडेकर यांचे हे आवडते गाव- येथे १०० जणांची ज्ञानेश्वरी तोंडपाठ आहे असे म्हणतात. १०।१२ घरी जाणे झाले, काही पीडीतांच्या भेटी झाल्या. जेवल्याशिवाय तेथील मंडळी सोडावयास तयार नव्हती. भोजन झाले. तशी तेथील मंडळी म्हणाली, आता आम्हास भोजन द्या ! ती रसिक मंडळी त्यांना भोजन वरण भाताचे नको होते. पुरणपोळीचे हवे होते. त्यांची पुरणपोळी म्हणजे ज्ञानेश्वरी ! ॥ कर्मे इशु भजावा ॥ मला वाटते ज्ञानेश्वरीचे हे सार आहे. सत्कर्म योगे वय घालवावे यावर

चांगला १ तास बोललो. आणि सर्वांचा निरोप घेऊन मुकटीचा मार्ग धरला. धुळ्याच्या सर्व लोकांना परत पाठविले.

मुकटीच्या बाहेर शेतात मुक्काम. पुढे मुकटी ते सारवे प्रवास. प्रथम मेंढाळी नावाचे खेडे लागते. तेथे मागून एक मोटार सायकल आली आणि माझ्या शेजारी ती थांबली. क्षणात ती व्यक्ती खाली उतरली आणि रस्त्यातच त्या व्यक्तीने साष्टांग नमस्कार घातला. त्या व्यक्तीचे नाव आहे देवीदास. स्वामींचा भक्त. त्याचा मुलगा मुका आहे. पण सुधारणा होत आहे. तो अक्कलकोटलाच गेला होता. धुळ्यास मी त्याचे घरी गेलो होतो. मी त्याचे घरी येऊन गेल्याचे त्याला समजले मात्र तो तडक माझ्या भेटीसाठी निघाला. त्याने अक्कलकोटचा अंगारा व प्रसाद दिला. मग आम्ही चहा घेतला. भेटीने तो आनंदला होता.

पारोळ्याचे अलिकडे श्रीसद्गुरू नामसंकीर्तन आश्रम आहे, तेथे दुपारी विश्रांती घेतली. आश्रम उत्तम आहे. स्वच्छ आहे. निर्मळ आहे. पारोळे म्हणजे राणी लक्ष्मीबाई झाशीवाली हिचे माहेर. येथे बालाजीची रथ-यात्रा मोठ्या प्रमाणात होते. सारवे येथे एका शेतात झोपलो. तेथील शेतकऱ्याच्या ते लक्षात आले आणि त्याने एक ग्लासभर दूध आणून दिले आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता धारोष्ण दूध आणून दिले.

पारोळ ते सारवे प्रवास करताना एक सायकलवाला तरुण भेटला होता. तो दुधाच्या बरण्या घेऊन दूध केंद्रावरच चालला होता. मनात असा विचार आला की, सारे दूध मुंबईस जाते– खेड्यातल्या मुलांना काही दुधाचा थेंब मिळत नाही. आपणास तरी कुठे दूध मिळते ? असा विचार आला मात्र– लगेच तो तरुण सायकलवरून खाली उतरला– आणि त्याने मला दूध दिले. तो पैसे घेत नव्हता. त्याला मी सांगितले ते दुधाचे पैसे नाहीत. हा प्रसाद आहे. हा रुपया (नाणे) कधी खर्च करू नकोस. ती स्थिर लक्ष्मी म्हणून राखून ठेव. पुढे ती वर्धमान लक्ष्मी होईल.' त्याने प्रसाद घेतला. नमस्कार केला. वाता सारवे येथे सायंकाळी दूध– पहाटेधारोष्ण दूध– या दुधाचा संदर्भ पुढे येणारच आहे.

सारवे, एरंडोल, एकलग्न नंतर पाळधी. एरंडोल तालुका बागायतीने समृद्ध ! केळीच्या बागा, दुतर्फा आम्रवृक्ष ! उन्हाचा त्रास झाला नाही. रस्त्यात पिंपळखेडा. एकलग्न येथे भाविक लोक भेटले. बसमधून

उतरून माझ्याबरोबर ४१५ मैल चालले. देव म्हणजे काय ! हे त्यांना समजावून घ्यावयाचे हते. पाळधीच्या बाहेर मुक्काम करून दुसरे दिवशी जळगाव येथे आलो. जळगाव म्हणजे सौभाग्यवतीचे माहेर. तिची वयोवृद्ध माता वाट पहात होतीच. आता मी जावई म्हणून आलो नव्हतो. तर जगन्नाथाचा यात्रेकरू म्हणून आलो होतो. जगन्नाथाचा यात्रेकरू– स्वामींचा पुत्र म्हणूनच त्या माऊलीने सत्कार केला. दुसऱ्या दिवशी श्वशुरांची श्राद्धतिथी म्हणून थांबणे कर्तव्य होते. अनेक मित्र भेटून गेले. श्राद्ध आटोपून नशिरावादकडे निघालो. वाटेत श्री. जहागिरदार वैद्य यांचेकडे कॉफीपानासाठी थांबलो. एक उत्तम वैद्य. गरीबांकडून अनेक आशीर्वाद मिळवलेले. सालस स्वभाव पण त्यांची ही शेवटचीच भेट ठरली हे दुर्दैव !

नशिराबाद येथे गावात न जाता गावाबाहेर जाऊन महादेव मंदिरासमोर झोपलो. रात्री १०-११ वाजता श्री. राजाभाऊ गर्गे आपल्या सर्व कुटुंबासह माझा शोध करीत आले. त्यांनी भरपूर दूध आणले होते. ते घ्यावेच लागले. आपणास दूध मिळत नाही, हा विचार मनात आल्याबरोबर स्वामींनी दुधाचा असा मारा सुरू केला ! स्वामींना मी विनंती केली की चुकलो आता. अमके मिळत नाही, अमके हवे असे मनात आणणार नाही.

नसिराबाद ते भुसावळ– भुसावळला शालक रहातात. त्यांचेकडे मुक्काम करून, क्षेमकुशल पाहून पुढे निघालो. वरणगाव एदलाबाद मार्गावर काहूर खेडे येथे मळ्यात विश्रांती. उत्तम पाणी, पपई, केळी यांचा फलाहार. रात्री सालवर्डी येथे शेतात मुक्काम. प्रभाकर झोपे या तरुण शेतकऱ्याचा परिचय झाला.

एलदाबाद– मलकापूर– मलकापूरचे बाहेर शेतात मुक्काम. मलकापूरला फार ओळखी म्हणून गावात जाण्याचे टाळले फाल्गुन अमावस्या आज शक गणनेप्रमाणे एक वर्ष संपते. उद्या गुढी पाडवा लवकरात लवकर उठावे. स्नानादि आटोपून नव्या वर्षाचा काही संकल्प करावा हा विचार करीत झोपलो.

# अध्याय ४ था

वर्षप्रतिपदा शालिवाहन शतकाचे नवीन वर्ष. आज सूर्याचे स्वागत गुढी उभारून करावयाचे. गुढी उभारणे म्हणजे काही सत्संकल्प करणे. लिंबाची कोवळी पाने गुळासह खाणे. त्यात काही आरोग्यशास्त्र आहे. आपण व्यावहारिक अर्थ असा घेऊ की कडू ते गोड करणे. मी आज संकल्प केला की मलकापूर ते खामगांव अंतर ५० कि. मीटरचे आहे. आज ते पार करावयाचे रोज माझे चालणे ३० कि. मीटरचे आसपास असे. निसर्गात फार रमत असे. नुसती चाल करणे यापेक्षा निसर्गात रमणे. देव माणसे रस्त्यात भेटतात. त्यांच्यात रमणे ही माझी आवड. ५० कि. मी. चालणे मला अवघड होते. पण ते मला साध्य झाले. खामगावला पोहोचलो. आपल्या सर्वांच्या घरी आज पक्वान्न केलेले असणार मला काय मिळणार ? मित्रहो, आपल्या घरी एकच पक्वान्न केलेले असणार मला पंचपक्वान्ने मिळाली. मार्गावर घरे होतीच. घरातून रस्त्याने चालताना मला कुणी पहात असे त्यांना काय वाटत असेल कुणास ठाऊक ? त्यांनी मला घरात बोलवावे हातपाय धुण्यास पाणी द्यावे, पाट मांडावा, काही पक्वान्न समोर ठेवावे. आणि नमस्कार करावा मी परिचय करून घ्यावा, पक्वान्नाचा आस्वाद घ्यावा. त्यांचे कल्याण होवो म्हणून आशीर्वाद द्यावा आणि पुढे निघावे. गुलाबजाम, श्रीखंड, पुरणपोळी, बासुंदी, केशरीभात आणि खामगावच्या वेशीवर सत्यनारायणाचा प्रसाद ! स्वामींना भक्ताची किती काळजी असते पहा ! खामगावला पुतण्या असतो त्याचे घरी गेलो तेथे जरा बासुंदी उष्टावली. त्याचे घरीच झोपलो. पहाटे स्नान वगैरे आटोपून शेगावच्या मार्गावर चालू लागलो.

आज स्वामी–जयंती. तेव्हा श्रीगजानन महाराजांचे संस्थानात आज वसतीस रहावे असे योजिले होते. त्याप्रमाणे घडत होते. आज अंतर काय फक्त १६ कि. मी. चालावयाचे म्हणून सावकाश चालावे. असा

विचार केला. शिवाय कालची चाल जास्त झालेली पण मागून आपणास कुणी ढकलत आहे व पुढे कोणी ओढत आहे असा विलक्षण वेग चालीस आला. कारण लोहचुंबक शेगावला होता. अगदी आरतीच्या वेळी आलो गुरुवार म्हणून गर्दी फार होती. श्री गजानन महाराजांचे दर्शन घेतले. व्हरांड्यात एका कोपऱ्यात जाऊन बसलो. स्वामी स्वरुपानंदांच्या ओव्या वाचत होतो. जरा गुंगी आली. पुस्तकात चष्मा ठेवून पुस्तक मिटले, डोळे मिटले. बसल्या बसल्या अगदी झोपच लागली. ५–१० मिनिटांनी जाग आली पुस्तक उघडले– आश्चर्याचा धक्काच बसला. तेथे २५० रु.च्या नोटा!! इकडे तिकड पाहिले. कुणी माझ्या भेटीस आले आहे का म्हणून चौकशी केली. दाता कुणी सापडेना– दुपारपर्यंत वाट पाहिली. दाता कोण! स्वामी किंवा गजानन महाराज!! जरा अंतःर्मुख झालो आणि कोडे उलगडले. स्वामी आपली परीक्षा पहात आहेत. परिश्रमाशिवाय पैशाचा स्वीकार करणे ही लांच आहे– हे पाप आहे. आपल्या मेहनतीने जे मिळाले तेच आपले. तत्काळ रु. २५०/– घेतले आणि श्रीगजानन महाराजांचे पुढे ठेवले. तेव्हा मनाला समाधान लाभले. एका पापापासून बचावलो! या वेळी एक गोष्ट आठवली. एक संन्यासी नदीवर स्नानास जात होते. मार्गावरील वाळूत काही चकाकलेले दिसले- ते जवळ गेले पाहिले तर तो सोन्याचा एक मोठा तुकडा- त्यांनी तो उचलून घेतला कफनीत ठेवला. स्नान केल्यानंतर त्या सोन्याचा मालक शोधू व त्याला तो देऊ असा विचार करून ते परत निघाले वाटेत एक धोबी भेटला. त्याला त्यांनी विचारले, 'हा तुकडा येथे पडलेला मी पाहिला. त्याच्या मालकाच्या शोधात मी आहे. हा तुझा आहे का?' धोब्याने उत्तर दिले, 'महाराज, गेले तीन दिवस तो मी येथे पहात आहे.' मनाची काय ही धारणा!!

सायंकाळी अचानकपणे सौभाग्यवती व तिच्या बहिणी यांची भेट झाली त्या सायंकाळी आल्या त्यांनी खूप शोधाशोध केली. पण मी पदयात्रा करीत आहे असे कुणासच सांगितले नव्हते. त्यामुळे त्यांना माहिती कोण देणार? पत्नी म्हणाली, 'मला स्वामींनी शेगावला जाऊन भेट म्हणून सांगितले म्हणून आले. तुम्ही २/३ तास भेटला

नाही तेव्हा काळजी वाटली. आता निर्धास्त झाले,' मी हसत हसत विचारले, ' काय, कशी आहे माझी तब्येत ?' सर्वजणी एकदम म्हणाल्या, ' वा छान, पण उन्हाने काळवंडला आहात ' सर्वांचे कुशल कळले. दुसरे दिवशी त्या जळगावला गल्या. मी पोस्टात जाऊन माझे टपाल घेतले. पोस्टमास्तरांनी आत बोलाविले आणि म्हणाले, गेले १५ दिवस पत्रे येत आहेत; आणि रोज २५ ३० पत्रे ! आपण आहांत तरी कोण ?' थोडा परिचय करून दिला. ठाणे ते जगन्नाथपुरी पदयात्रा करीत आहे. असे सांगितले. त्यांनी सर्व स्टाफचा परिचय करून दिला आणि सर्वांना लिंबाचे थंडगार सरबत करून दिले. ४००।४५० पत्रे घेऊन नागझरीला गेलो. नागझरी एक रम्य शांत ठिकाण. नाथपंथीयांचे एक पवित्र स्थान !

नागझरीला सव पत्रे वाचली. सारी पत्रे स्नेहाने, भक्तीने, प्रेमाने, वात्सल्याने ओथंबलेली. सर्व महाराष्ट्रातून आलेली पत्रे ही पत्रे मला नव्हतीच ! सारी स्वामीनाच समर्पित होती. त्या गुरुमाऊलीला समर्पित होती. त्या सर्वांना क्रमाने उत्तरे देणार होतो. ते माझे कर्तव्यच होते. एका कुटुंबातील सर्वांनी मिळून लिहिलेले पत्र हृदयस्पर्शी होते. परिस्थितीने गरीब पण मनाने, वृत्तीने श्रीमन्त असणारे कुटुंब ! त्यांना प्रथम उत्तर लिहिले.

दुसरे दिवशी नागझरी ते पारस. पारस येथे श्रीराम आणि कृष्ण यांचे उत्तम मंदिर आहे. दर्शन घेतले. पुढे अकोला मार्गावर २-३ जीप्स मागून आल्या, थांबल्या. ' बाबा, कुठे चाललात ! अकोल्याला ना ? चला, बसा गाडीत !' मी नकार दिला. ते सरकारी अधिकारी खाली उतरले. परत त्यांनी विनंती केली. माझा नकार कायम होता. मग त्यांनी मार्गदर्शन केले. हा रस्ता लांबचा आहे. तुम्ही रेल्वेलाईनवरून जा ८-१० कि. मी. अंतर वाचेल हा त्यांचा सल्ला मानला. गाड्या पुढे निघून गेल्या. मी रेल्वे लाईनने चालू लागलो. पण तेथे सावली नव्हती. फक्त बाभुळीची झाडे आणि त्यांचे काटे ! ११-११॥ वाजले ऊन चांगले कडक होते. अगदी पार थकलो. ग्लानी आली. रेल्वेलाईन-वरून खाली उतरलो. एका शेतात आंब्याच्या झाडाची दाट सावली होती. तेथे जाऊन पडलो. थकवा असा आला होता की, गाढ झोप लागली ! १॥ वाजता जागा झालो. आज सकाळपासून पोटात काही


[library stamp] ६९ ... ५२५९

नव्हते. जवळही काही नव्हते. सडकेने गेलो असतो तर कुठे तरी काही खाता आले असते. आता पाण्याचा घोट घ्यावा व स्वस्थ पडावे, ऊन जरा कमी झाल्यावर शोधाशोध करावी, पाणी पिण्यासाठी उठून बसलो. एकदम ३।४ शेतकरी जवळ आले. ते म्हणाले, ' बाबा, तुम्हाला काय गाढ झोप लागली होती ! अहो आम्ही १।। तास येथे बसलो आहोत, तुम्ही जागे होण्याची वाट पहात आहोत ! चला आता पोटभर जेवा.' त्यांनी लगेच समोर भाकरी, भाजी, चटणी ठेवली– पाण्याची घागर पुढे केली. मी त्यांना विचारले, ' अहो पण तुमचे जेवण ?' ते म्हणाले. ' बाबा, आम्ही जेवूनच निघालो. ही भाजी भाकरी तुमच्यासाठी आहे.' पण मी त्यांना आग्रह केला. आमचे सहभोजन झाले. भोजन झाल्यावर त्यांनी नमस्कार केला. त्यांना कुठे काम होते. त्यांना मी ५ रु. नोट देऊ लागलो. पैसे ते घेईनात. अन्न विकायचे असते का ? हा त्यांचा प्रतिप्रश्न ? अशिक्षीत माणसे अशी शहाणी असतात. मग मला एक कल्पना सुचली. ' बाबानो, मी हे पैसे तुम्हाला देत नाही. तुमच्याकडे गाय असेल, बैल असतील त्यांच्या चाऱ्यासाठी देत आहे. माणसाने काहीही न करता खाऊ नये. माझ्या हातून एक कर्तव्य तरी होऊ द्या.' गाईसाठी घास म्हणून त्यांनी नोटेचा स्वीकार केला. मला समाधान वाटले. मला त्यांनी पुढील मार्ग सांगितला. ते निघून गेले. मी विचार करू लागलो. स्वामीच ही सर्व व्यवस्था करतात. नाहीतर कोण कुठले शेतकरी? दीड तास आपल्यासाठी थांबतात काय ? भाजी भाकरी आणतात काय ? आणि मी कोण कुठला ? माझ्या अंगावर भगवी वस्त्रे नाहीत. ललाटी भस्म नाही. टिळा नाही. गळ्यात, हाताला रुद्राक्ष नाहीत ! पण स्वामींचा पुत्र ! स्वामी मायबाप ! सर्व काही पहातात !

सायंकाळी अकोल्याच्या आगरवेशीवर शेतात मुक्काम. श्री नागोरावजी नथ्थुजी उगले यांचे ते शेत.

दि. १-४-७९ ला सकाळी श्री. काटेकर यांचे घरी १५–२० मिनिटे थांबून गुलाबाची २ फुले घेऊन पोस्टातून टपाल घेतला. नंतर अशोक वाटिकेत विश्रांती घेतली. मूर्तिजापूरचे रस्त्यावर बाभुळगावचे पुढे शेतात मुक्काम. नंतर बोरगांव– काटेपूर्णा– वणी– मूर्तिजापूर.

त्यानंतर कारंजाच्या मार्गावर चालू लागलो. खेर्डा गावी दुपारची विश्रांती, सायंकाळी कारंजा. कारंजा श्रीनृसिंहसरस्वतीचे जन्म ग्राम. श्रीनृसिंहसरस्वतीचे मंदिर आहे. श्रीनृसिंहसरस्वतीची मूर्ती फारच सुंदर आहे. रात्री आरती झाली. रात्री झोपण्यासाठी एका पुजाऱ्याने फार त्रास दिला. तेथील अधिकारीच तो. ३ वेळा स्थलांतर! शेवटी खोलीत जाऊन झोपलो. घामाच्या धारा वहात होत्या. सकाळी ४ वाजता उठून शुचिर्भूत झालो. गाभाऱ्याचे दार उघडावयाचे होते म्हणून खोलीतच ध्यान करीत वसलो. तोच ६ वाजता ज्या अधिकाऱ्याने रात्री मला ३ वेळा स्थलांतर करावयास लावले होते– ते गृहस्थ लगबगीने आले. त्यांनी माझे पाय धरले आणि क्षमा मागितली. ते म्हणाले, 'मी तुमचा अधिकार ओळखला नाही.'– श्री नृसिंहसरस्वती काल स्वप्नात आले– चावकाने फोडून काढले आणि म्हणाले, 'मला ओळखत नाहीस. इतका माजलास का? जा त्यांची क्षमा माग! तेव्हा आपण मला क्षमा करावी.' मी सांगितले, 'अहो मी कुणी नाही. केवळ मी स्वामींचा पुत्र आहे. आता आपण गाभाऱ्याचे द्वार उघडा. मला दर्शन घ्यावयाचे आहे. शांतपणे दर्शन झाले. श्री नृसिंहसरस्वतीची पूजा झाली. महाप्रसाद घेतला आणि पुढे निघालो. आता माझी सर्व सोय होत होती. बरोबर रात्रीकरिता प्रसादही मिळाला. पुजाऱ्याने कसे वागावे यासाठीच हा उल्लेख केला आहे. माझ्या प्रौढीसाठी नाही सर्व महत्त्व स्वामींचे आहे. स्वामीचे विस्मरण ज्या क्षणाला होईल त्या क्षणाला माझ्या देहाचा कोळसा होईल ही जाणीव मी सदैव बाळगून आहे.

मूर्तिजापूर ते खेर्डा रेल्वे लाईनच्या रस्त्यावर– शाहा नावाचे गाव लागते. त्या गावाच्या वेशीवर एक गृहस्थ उभे होते. जणू काय ते माझीच वाट पहात होते. त्यांनी हसतमुखाने स्वागत केले. घरी नेले, पाणी दिले आणि माझ्या लक्षात आले हे गृहस्थ अध्यात्मातील अधिकारी आहेत. ज्ञानेश्वरीचा गाढा अभ्यास आहे. अशी माणसे भेटली की आनंद वाटतो. अशी माणसे आपोआप भेटतात. दूध घेऊन त्यांचेकडून निघालो. रात्री ८ वाजता खेर्डा येथे पोहोचलो. शेतात शांतपणे झोपलो

दुसरे दिवशी सकाळी खेर्डा येथून निघून बडनेरा– अमरावती. मार्गावर चालू लागलो. करमगांव– धनज करून दुपारी धनज येथे

विश्रांती. नंतर धनज ते बडनेरा प्रवास. वडनेराच्या अलिकडे २ मैलावर रात्रीचा मुक्काम. खेर्डा ते बडनेरा मार्गावर पाणपोईची उत्तम व्यवस्था केलेली आहे. सर्व विहीरींवर दोर, बादली, पाणी पिण्यासाठी भांडी, ही व्यवस्था आहे. सर्व अगदी स्वच्छ आहे.

श्रीनृसिंहसरस्वतीचे दर्शन अनेक वर्षांनी झाले व ते पायी जाऊन झाले याचे मनाला फार समाधान वाटले.

# अध्याय ५ वा

बडनेरा–अमरावती या मार्गावर श्रीगोविंदाश्रम लागला. गोविंदाश्रमामध्ये स्नानादि कार्यक्रम आटोपून ध्यान केले. श्री मकाणे महाराज यांची समाधी आहे. राम–कृष्ण मंदिर वगैरे सर्व उत्तम ठेवले आहे. सर्व खाजगी आहे. अमरावती शहरांत येऊन जेवण केले. पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन टपाल घेतले. सौभाग्यवतीचे व चि. सौ उज्वलाचे पत्र होते. तेथेच उत्तरे लिहिली. तशीच प्रवासास सुरुवात केली. अमरावतीत इतक्या ओळखी आहेत की सर्वांना भेटण्यास आठवडा तरी लागेल. परंतु त्यात गुरफटून घ्यावयाचे नव्हते शक्य तितक्या लवकर शहराचे बाहेर पडावयाचे होते अमरावतीच्या वेशीवर एक मंदिर आहे. श्रीसमर्थ रामदासांचे ते मंदिर आहे अगदीं स्वच्छ ! ! तेथे विश्रांती घेतली. चहा झाला पुढें निघालो. आता नागपूर रस्ता लागला. श्री तट्टे यांचा मळा लागला. त्या मळचात झोपलो

पुढे नांदगांव, मोझरी. मोझरी येथे गुरुकुंज आहे. संत तुकडोजी महाराजांच्या समाधीच दर्शन घेतले. संत तुकडोजींची भजने अनेक वेळा ऐकली होत त्यांचा पहाडी आवाज मोठमोठ्या जमावाला मंत्रमुग्ध करीत असे . मंगलमय नाम तुझें–सतत गाऊं दे ।। हे गीत मनांवर अद्याप ठसलेले आहे तिवसा गांवाबाहेर शेतात झोपलो. दुसरे दिवशीं तळगांवला उसाचा रस उत्तम मिळतो तो घेतला. तळेगावला पुढे घाटाचे पायथ्याशी मारुती मंदिर आहे तेथे विश्रांती–रात्री सावरखंड येथे शेतात मुक्काम !

दुसरे दिवशी प्रथम कारंजा लागले. हे कारंजा दुसरे आहे. कारंजा (वर्धा जिल्हा) श्री भगवान् भारती बाबा, यांचा मठ श्रीसंत गुलाब यांचा आश्रम, नागलवाडी देवस्थान पुढे ठाणेगांव महादेव मंदिर–रात्री एका वडाच्या झाडाखाली झोपलो.

सकाळी कोंडाली–पुढे ४ कि. मी. वर साईबाबांचा दरबार आहे. संत गुलाबबाबांचे आश्रम येथे बऱ्याच ठिकाणी आहेत. श्रीगुलाबबाबा हयात आहेत. संत गुलाबराव महाराज निरळे ते ज्ञानेश्वर कन्या होते कृष्णपत्नी होते. या रस्त्यावर ·ागायती भरपूर आहेत. त्यामुळे हवेत गारवा वाटला बाजारगांव येथे पुरातन मंदिर व जैनांचे तीर्थक्षेत्र आहे. शेतांत झोपलो. दुसरे दिवशी सकाळी पेठ .रस्त्यावर भरपूर मळे पहात चलावे. नागपूरचा विस्तार फार वाढलेला वहातूक वाढलेली. दुपारी नागपूरच्या हद्दीत आलो. भरतनगरमध्यें चुलत बंधु रहातात. त्यांचेकडे मुक्काम. दुसरे दिवशीं सकाळीं सीताबर्डीवरील काहीं मित्रांना भेटून आलो सायंकाळी भरतनगर मधील श्रीदत्तमंदिरात व्याख्यान, अनेकजण नंतर भेटीस आले. दुसरे दिवशी मुक्काम सकाळींच हलविला. परम मित्र श्री. × × यांचे घरी दत्त म्हणून उभा राहिलो. परममित्र असले तरी आता माझी दाढी वाढलेली होती. वेष यात्रेकरूचा होता. त्यांचे स्मरणांत माझें रूप दुसरेच होते. Sales Executive चांगला सूट, टाय–चमकणारे बूट ! त्यांचा फार गोंधळ उडाला–मी त्यांचे घरील सगळ्यांची नांवे घेऊन चौकशी करीत होतो. इतकी बारीक सारीक माहिती असणारे हे कोण महाराज आहेत ! ! मी सरळ घरात गेलो हातपाय धुतले दत्ताला नमस्कार केला त्यांचा गोंधळ वाढतच गेला ! तव्हा मी गमतीने म्हटले, तुमचे मित्र ठाण्यास आहेत. त्यांचे नाव करंदीकर. त्यांनी तुमचा पत्ता दिला म्हणून तुमचेकडे आलो. तुम्ही-दत्तभक्त आहांत ना ? मला फार भूक लागली आहे तेव्हा चांगले पोहे करा. चांगले पोहे म्हटल्यावर ओळख पटली. श्री. ×× कडकडून भेटले. मग पोहे झालेच. जेवणाचे वेळेपर्यंत धरम पेठेतील काही मित्रांना भेटून आलो. श्री ×× यांचेकडे हक्काचे जेवण झाले त्यांनी विचारले, स्वामींची कृपा कशी झाली ? मी उत्तर दिले सत्कर्मांनी ! त्यांचे पूर्ण समाधान झाले. कारण त्यांना माझी पूर्ण माहिती होती.

दुपारी ३ वाजता चहा पिऊन निघालो. नरकेसरी प्रकाशनचे ऑफिसमध्ये आलो. श्री. बाळासाहेब गोरे, श्री. मा. गो. वैद्य, श्री. घुगरे, श्री. चंद्रशेखर फडणीस यांच्या भेटी घेतल्या. प्रथम श्रीमान् बाळासाहेब

गोरे यांनी ओळखले नव्हते. कारण दाढी वाढलेली. ओळख देताच त्यांना फार आनंद झाला.

सायंकाळी रेशीम बागेवर संघ शाखेत गेलो. तेथे मला ओळखणारे कुणी नव्हतेच. नवीन पिढी होती. प. पू. डॉ. हेडगेवार व प. पू श्रीगुरुजी यांच्या समाधींचे दर्शन घेतले. आज त्या समाधीच्या पायथ्याशीच झोपावयाचे होते. सर्वांनी सांगितले कार्यालयांत चांगली व्यवस्था आहे. पण त्या व्यवस्थेची मला गरज नव्हती. रात्री त्या युगपुरुषांचे स्मरण करीत झोपलो. त्यांच्या जीवनातल्या एकेक दिव्य शलाकांचे दर्शन घेतले. डॉक्टरांचा सहवास मला फार कमी लाभला. श्री. गुरुजींचा सहवास अनेक वर्षे लाभला. माझी साम्यवादी विग्रहावर, आधारित, विध्वंसक वृत्ती श्री. गुरुजींनी बदलली आणि सर्व संग्राहक, एकात्म भावनेची, विधायक वृत्ती त्यांनीच तयार केली. माझ्या त्यांच्याबद्दलच्या श्रद्धा एका कवीने केलेल्या एका ओळींत पूर्णपणे सामावल्या आहेत.

।। असावा कसा तो प्रभू श्रीहरि ।।

सकाळी उठून परत त्या समाधीचे दर्शन घेऊन नागपूर शहरात निघालो. वाटेतच एक संघ शाखा लागली. मा. बापूराव वऱ्हाडपांडे यांची भेट झाली. तेथून संघकार्यालयांत पू. बाळासाहेब देवरसांच्या दर्शनास गेलो तेथेच श्री. बाळासाहेब गोरे यांची भेट झाली. श्री. बाबूराव वाघ भेटले. पू. बाळासाहेब देवरस यांना १९३९ सालापासून ओळखतो. पू. बाळासाहेब म्हणजे मूर्तिमंत कर्तृत्व ! ! श्री. कृष्णराव मोहरीर यांच्या हातचा खडीसाखरेचा खडा मिळाला. खडीसाखर म्हणजे कृष्णराव ! ! कार्यालयांतच जेवावे हा त्यांचा आग्रह. सर्वांसमवेत जेवलो. १ तास विश्रांती घेतली आणि पुढच्या मार्गावर निघालो. नागपूर पासून भंडारामार्गावर १३ कि. मी वर एका शेतात झोपलो. रात्री वादळ व थोडा पाऊस आला.

दुसरे दिवशी मौदा पार करून वाटेत झाडाखाली विश्रांती व सायंकाळी बोरगाव गावांत वॉटरबॅगमध्ये पाणी भरून घेतले व गावाबाहेर दोन मैलावर जाऊन शेतात मुक्काम केला. तोच प्रचंड वादळ सुरू झाले. दोन शेतकरी आले, ते म्हणाले, ' बाबा, पाऊस येणार आहे.

जवळ जिनींग प्रेस आहे. तेथे आश्रयाला चला.' श्रीमंतांचा आश्रय मला नको होता, मी नकार दिला. ते शेतकरी निघून गेले. शेतकऱ्यांचा हवामान अंदाज बरोबर येतो. थोड्याच वेळांत आकाशात काळ्याकभिन्न ढगांची गर्दी झाली. जणू टपोरी पिकलेली जांभुळे ! केंव्हा टपकतील हें सांगता येत नाही. ढगांचा गडगडाट कानठळ्या बसवत होता. वादळ आले की मेघ विखुरतात पण तसे काही होत नव्हते. ढगांची गर्दी वाढत होती. वादळाचा वेग प्रचंड होता. भरलेली वॉटरबॅग गदगद हलत होती. वादळाच्या जोराने ती उडून जाईल की काय असे वादळ वेगवान होते. धुळीचे लोट उडत होते. मी पाठीवरील पिशवी काढून त्यावरच बसलो होतो. निसर्गाने रौद्र रूप धारण केले होते. माझा निश्चयही तसाच ठाम होता. सायंकाळी ६॥ ते ८ हे तांडव चालू होते मनांत रामरक्षा भीमरूपी स्तोत्र चालू होते. श्रीरामाचा जप चालू होता. साधारण ८ वाजता स्वामींना आर्ततेने बोलाविले आणि माझ्यात कोणते बळ आले कुणास ठाऊक ! आकाशाकडे डोळे वटारून पाहिले. हात उंच केला आणि खडसावून सांगितले. ' बस्स्, पुरे झाले हे नाटक ! लक्षात ठेवा. मजजवळ स्वामी आहेत.' आणि केवळ ५ मिनिटांत वादळ शमले. विजांचा कडकडाट बंद झाला. ढग पांगले. आकाश स्वच्छ झाले. आकाशात प्रकाश पसरला आणि मी घड्याळ पाहिले घड्याळात ८-१० झाले होते. मीच आश्चर्यचकित झालो ! !

**॥ निसर्गास त्यांनी पराभूत केले**

**म्हणूनी तयांना मना अर्पियेले ॥** या ओळी आठवल्या

मित्रहो, या घटनेवर तुमचा विश्वास बसेल का ? माझा आजही विश्वास बसत नाही. पण ही सत्य घटना आहे जे सत्य आहे ते केवळ बुद्धीला आकलन होत नाही म्हणून का लपवावे ? माझ्या जीवनांत असे अनेक प्रसंग घडले आहेत की बुद्धीला आकलन आजही होत नाही. जेंव्हा बुद्धी लुळी पडते तेव्हां केवळ म्हणतो– ' स्वामिन् तव शरणम् '

**॥ आमुच्या ठायीं नच शक्ति तव वर्णाया महिमान ॥**

**॥ स्वामिन् तव शरणम् ॥**

# अध्याय ६ वा

बोरगांव ते भंडारा प्रवास फार जोरात झाला. वेगाने झाला. सकाळची हवा मोठी प्रसन्न असते. मन प्रसन्न होते. भंडारा येथे चि. हेमंत, चि. सौ. मंगल व सौभाग्यवती यांची पत्रे मिळाली. चि. हेमंतला लगेच उत्तर लिहिले. नंतर वैनगंगा नदीवर स्नान केले. कपडे धुनले. सायंकाळी करधा गावाचे बाहेर झोपलो.

भंडारा जिल्हा म्हणजे आंबेडकर अनुयायी यांचा. नवबौद्धांचा. चौकाचौकात आंबेडकरांचा पुतळा आणि निळे झेंडे रस्त्याच्या दुतर्फा आंब्यांची झाडे आहेत. सहज कैऱ्या घ्याव्यात आणि कचाकच खाव्यात अगदी दात आंबेपर्यंत ! धारगाव छोटे पण स्वच्छ गांव. आता गाढेगांव वनप्रकल्प अशा मार्गाने जाण्यात मजा वाटते. Guard of honour देण्याकरिता दुतर्फा सैनिकांच्या जणू फलटणी उभ्या आहेत. आंब्याची झाडे विपुल आहेत. लाख गोळा करणे व भात शेती करणे हे प्रमुख उद्योग आहेत. मँगनीजमुळे भंडारा संपन्न आहे. गावांपेक्षा छोटया छोटया वस्त्या जवळ जवळ आहेत. S T. चे स्टँड नाहीत. वृक्षांची सावली हेच स्टँड ! वृक्ष डेरेदार ! असाच एका वृक्षाखाली दुपारी २ा वाजता विश्रांतीसाठी बसलो. एक बैलगाडी सोडलेली होती तिचे आसन केले. ऊन कडाडले होते. डांबरी रस्त्यावरील डांबर वितळले होते.

मी बसलो होतो, जवळच लहान मुले खेळत होती. त्यांचा खेळ पहात होतो. त्यांनी एक डोंगर बांधला होता. आणि वरून अनेक नद्यांचा उगम दाखविला होता. पाटबंधारे खात्यातील जणू भावी इंजिनिअर्स ! वॉटर बॅगमधील पाणी तापले होते. म्हणून त्या मुलांजवळ पाणी मागितले. एका चुणचुणीत मुलाने वॉटरबॅग भरून आणली आणि एक गुळाचा खडा व गार पाण्याचा तांब्याही भरून आणला. गुळाचा खडा खाल्ला. थंड पाणी प्यायलो. त्याची आई लांबवर उभी राहून

पहात होती. तांब्या परत केला. त्या मुलांना कैऱ्यांचे काप करून दिले. चाकू बरोबर होता. त्याचा उपयोग होतो. पाणी जवळ नसले तर लिंबाचे झाडाचे मूळ कापावे. पाणी झिरपते असे म्हणतात. मी मात्र अद्याप अनुभव घेतलेला नाही. ३–३॥ वाजता ८–१० स्त्रिया डोक्यावर धुण्याची घमेली घेऊन नदीवर निघाल्या, साऱ्या अनवाणी होत्या. आपल्या मुलांशी हा बाबा काय बोलतो आहे याचा कानोसा घेण्यासाठी त्या जरा थांबल्या. मग त्यांनी माझी चौकशी केली. त्यांना जगन्नाथ वगैरे काही माहीत नव्हते. देव आकाशात असतो व तोच सर्व काही करतो– हेच साधे भोळे ज्ञान ! देवाचा विषय निघाला आणि माझी तार लागली– चांगला एक १ तास देवाबद्दल बोलत होतो. ऊन कडाडले होते. रस्त्यावरचे डांबर वितळले होते. त्यांचे पाय पोळत असतील. डोक्यावर ओझेही हे माझ्या लक्षातही आले नाही. मी बोलत होतो. त्या मान। डोलवत होत्या. भान हरपले होते. माझी चूक माझ्या लक्षात आली आणि मी त्यांना म्हणालो, 'तुम्ही धुण्यासाठी निघाला आहात ना ?' हे त्यांच्याही तेव्हाच लक्षात आले आणि त्या जरा लाजूनच– हात जोडून धुण्यासाठी गेल्या. काळ वेळ न पाहता आपली अशी तार लागते. लोकांना त्रास होत असेल. हा विचार मनात येतो. अनेक वेळा येतो. पण परमेश्वर हा विषयच असा आहे की त्याच्या थोरपणाचे वर्णन करण्यासाठी अष्टभाव दाटून येतात. पदोपदी परमेश्वराच्या थोरपणाचा अनुभव घेतलेला आहे. एकदा लांबच्या प्रवासात मी डाळिंब घेतले. ते फोडले आणि त्यातून परमेश्वराची कला प्रकट झाली. डाळिंबी रंगच मोहक ! दाणे किती सुंदर ! आणि त्यांची रचना किती उत्तम आणि त्याची चव काही औरच ! परमेश्वराची ही लहानशी कलाकृतीदेखील किती सुंदर ! साऱ्या प्रवासभर डाळिंबातील परमेश्वर पहाण्यात, जाणून घेण्यात रमून गेलो होतो. डाळिंब तयार करण्याचा कारखाना विज्ञानाला कोणत्या शतकात काढता येईल ? जो शास्त्रज्ञ हे करील तोच माझा परमेश्वर मानीन ! असो.

सूर्य कलल्यावर– त्या बालसवंगड्यांचा निरोप घेऊन निघालो. घाटेगावचे जंगल मोठे. वानरसेना फार. मात्र मला त्रास झाला नाही. जंगल तसे भयाणच पण दिवसाची वेळ होती. आता साकोलीजवळ

आलो. सायंकाळ झालेली. मजूर कामावर परतत होते. काही मजुरांना आत्मीयता वाटली. थांबून त्यांनी चौकशी केली आणि वसतीवर येऊन जेवण्याचा आग्रह केला. पण त्यांना सांगितले यात्रेत पुढेच जावयाचे असते. आता तोंड मागे फिरवून मला चालता येणार नाही.

आता एक विस्तीर्ण शेत शोधून काढले. जंगल संपले होते. गाव सुरू होणार होते. अद्याप वद्य पक्षच होता. त्यामुळे चंद्र उगवला नव्हता. सर्वत्र अंधार होता. वातावरण तसे भयानक होते. लोक म्हणतात प्रवासी लोकांना लुटणाऱ्या टोळ्या आहेत. मजजवळची संपत्ती लुटून नेण्यासारखी नव्हती !! मग मला कसे लुटणार ? माझ्या जवळची जी संपत्ती आहे ती लुटूनच अधिक वाढते. रात्री अगदी शांत झोप लागली. सकाळी साकोली गावात आलो. चहा घेतला. साकोलीहून देवरी मार्गावर चालू लागलो. चांगली नदी लागली. स्नान, कपडे धुणे हा कार्यक्रम झाला. नदीत स्नान करणे फार मजेचे असते. गोंदियाचा फाटा ओलांडून दुग्गीवर घाट चढू लागलो आताही जंगलच. मध्ये उंचावर महाकालीचे एक स्थान आहे. अखंड होमकुंड आहे. बैलगाड्या, ट्रक्स इथे थांबून देवीला नारळ, उदबत्ती ठेवतात. नारळ फोडून सर्वांना प्रसाद वाटतात. तेथे रात्री मुक्काम केला. सकाळी चिचोला मार्ग धरला. डोंगरगाव लागले. लाकूड हाच उद्योग. मोठे जंगलच आहे. देवरीला विश्रांती. औदुंबराचे झाड विश्रांतीला मिळाले. पुढे निघालो. रुक्ष, जंगल छाया कुठे नाहीच. रुक्ष जंगलांतून उन्हात प्रवास करणे म्हणजे एक दिव्यच ! मैल नि मैल जंगलच. सायंकाळी बाध नदी लागली. तेंव्हा हायसे वाटले. सायंकाळी नदीत डुंबून स्नान केले. सूर्याला अर्घ्य दिले. प्रसन्न वाटले. येथे महाराष्ट्र संपतो. मध्यप्रदेश सुरू होतो. चौकी आहेच. मारुतीचे मंदिर आहे. स्वच्छ अंगण आहे आज जेवणही चांगले मिळाले. भात-भाजी डाळ, लोणचे. अंगणामध्ये शांत झोप. अंगण चांगले सारवलेले होते. दुसरे दिवशी सकाळी महाराष्ट्र प्रांताचा निरोप घेतला. प्रवासाचा सारा चलत चित्रपट पाहिला ! महाराष्ट्रातील अंदाजे १२०० घरांशी माझा सबंध आहे. त्या सर्वांची आठवण केली. ज्या घरी प्रत्यक्ष गेलो आहे, त्या सर्व घरी मनाने जाऊन आलो. कारण सर्वांना घेऊनच जगन्नाथाचे दर्शन घ्यावयाचे होते. जे दुःखी असतील यांना सुखी कर अशी प्रार्थना करावयाची होती.

आता मध्यप्रदेशात पाऊल ठेवले. प्रथमच चढ सुरू झाला. सोमठाणे, दुतर्फा झाडी. प्रवासात हिरवे विश्व भोवताली असणे सुखाचे असते. चिचपार नंतर चिचोळा. दुपारची विश्रांती. या प्रदेशात विहीरीवर तरफा आहेत. राजनंदगाव मार्गावर शेतात झोपलो. सकाळी पुढे जाण्यास सुरुवात केली. थोडया वेळाने सकाळी ८ च्या सुमारास 'कोहका' हे गाव लागले. मला वाटते भारतातील हे सर्वोत्तम गाव ठरावे. ७०।८० घरांचे गांव. एकही हॉटेल नाही. दारु गावात नाहीच. घरापुढील अंगण अगदी स्वच्छ सारवलेले घराच्या भिंती सारवलेल्या. त्यासाठी पांढऱ्या मातीचा उपयोग केलेला. प्रत्येक घर असेच स्वच्छ, सुंदर. अंगण अगदी स्वच्छ. रांगोळीने सुशोभित केलेले, रस्ते स्वच्छ, बस स्टँडवर वडाचे पार बांधलेले. तेही अगदी स्वच्छ ! त्या पारावर बसावे असे वाटले. लोकांच्या प्रवासाची व्यवस्था उत्तम, गडबड नाही. गोंधळ नाही. श्री. मुनेश्वर प्रसाद तिवारी, ग्राम कोहका, पोस्ट तुमडीबोड जिल्हा राजनंदगांव मध्यप्रदेश. या व्यक्तीला तुम्ही जरूर पत्र लिहा. गाव म्हणजे एक कुटुंब एका विचाराने चालणारे एका ध्येयाने जाणारे.संतोष आणि तृप्तता ! मी मुनेश्वरला सहज गमतीने म्हणालो, 'गावात हॉटेल नाही. ठीक आहे. पण माझ्यासारख्या प्रवाश्याचे हाल.' (हिंदीत बोललो, कारण Hindi is always correct बोलभाषा, लोकभाषा) त्याने स्वच्छ गार पाणी आणले. मग साखर आणि पाणी माझ्या वॉटर बॅगमध्ये भरले. तोपर्यंत घरी शिरा तयार झाला होता. घरी नेले आणि प्रवाश्याचे काही हाल नाहीत हे दाखवून दिले. त्याच्या पाठीवर शाबासकीचा हात ठेवला. मी जगन्नाथपुरीला जात आहे कळल्यानंतर त्याला अपार आनंद झाला आणि श्रद्धेने त्याने केशरी गंधाचा तिलक माझ्या भाली लावला. केशरी गंधाचा तिलक भालप्रदेशावर लावल्यावर सात्विक भाव जागृत. होतात. मुनेश्वरचा निरोप घेऊन– राजनंदगावचे मार्गावर महादेवाचे एक मंदिर आहे तेथे मुक्काम केला

दुसरे दिवशी सकाळी राजनंदगाव. गावात शिरताच श्री. वि. गो. बापट यांची भेट झाली. त्यांनी घरीच नेले. श्री. बेलसरे यांची भेट झाली त्यांनीच पोस्टातून माझे टपाल आणून दिले. तोपर्यंत न्याहारी झाली. त्यांनी रायपुरचे काही पत्ते दिले. राजनंदगावचे वेशीवर एक

कृष्ण मंदीर आहे. खाजगी आहे. मालकाने रस्त्यावरून बोलाविले. आधीच तो कृष्ण भक्त, त्यात मी जगन्नाथाला पायी चाललो आहे कळल्यानंतर त्याला फार आनंद झाला. श्रीमंत गृहस्थ– द्वारकेच्या राण्याचीच पूजा करतो. कर्तव्यतत्पर माणूस– गीता सांगणाऱ्या श्रीकृष्णाची उपासना करतो. भक्त गोकुळातील कृष्णाची उपासना करतो. खरे कृष्णाचे रूप काय आहे ? अनंतच म्हणजे योग्य ! बर्फी हातावर घेतली आणि पुढे निघालो. दुपारी उन्हाचे वेळी झाडाखाली विश्रांती घेतली. ४ वाजता पुढे निघालो. गावे लागत होती. अंधार पडला– टॉर्च लावून चालत होतो. एखादे रम्य ठिकाण शोधत होतो. एखादे स्वच्छ मंदिर हवे होते. जवळ नदी किंवा जलाशय हवा होता. प्रशांत असा वडाच्या झाडाचा पार हवा होता. पण ठिकाण काही दिसत नव्हते. असे ठिकाण मिळेपर्यंत चालत रहावयाचे. नाहीतर दुर्ग-पर्यंत जावे असा विचार केला. दुर्ग बरेच लांब होते. रात्री ९।। पर्यंत टॉर्चचे प्रकाशात मार्गक्रमणा चालली होती. ९।। ला दुथडी भरून वाहणारी नदी दिसली. केवढा आनंद झाला ! पुलावरून नदी ओलांडली. काठावर आलो. डावीकडे गुरुद्वार व उजवीकड नदीला लागून शिवमंदिर जवळ वटवृक्ष, उत्तमपैकी पार, सारे काही स्वच्छ, शिवाचे दर्शन घेतले. वडाला नमस्कार केला. गुरुद्वाराजवळ जाऊन चांगली लस्सी प्यायलो. मनासारखी जागा मिळाली होती. उद्या स्वामींची पुण्यतिथी होती. तेव्हा अशीच जागा हवी होती. आणि तशीच ती मिळाली. अंधार झाला म्हणून कुठेतरी झोपलो असतो तरी हरकत काय होती ? काहीच हरकत नव्हती. स्वामी सर्वत्रच आहेत. परंतु देवपूजा अधिक चांगली करावी ही जिद्द मनात हवीच. सर्व मनासारखे लाभले म्हणून समाधानाने झोपलो.

# अध्याय ७ वा

## स्वामी पुण्यतिथी (चैत्र वद्य १३)

पहाटे ४ ला उठलो. शुचिर्भूत झालो. शिवशंकराला अभिषेक केला. वटवृक्षाची स्वामी समजून पूजा केली आणि स्वामींचा जप सुरू केला ।। ॐ नमो भगवते श्रीस्वामीसमर्थाय ।। पहाटे ५ ते सकाळी १० पर्यंत जप चालू होता. आणि त्यातूनच एकदम शब्द फुलले. फुलांची काव्यमय माला गुंफली गेली. जशी फुलली तशीच गोवली. काव्याचे नियम व्याकरण यांचा काही विचार केलाच नाही. जे उत्स्फूर्त असते ते तसेच ठेवावे त्यात मूळशक्ति असते

# भावदर्शन

वटपत्रशयनीच जो मूळपुरुष ।
लीलये खेळवितो पंचभूतास ।
तोचि प्रगटला प्रज्ञापुरीस ।
घेऊं तयाच्या आता दर्शनास ।। १ ।।

समाधिस्थ झाले जरी स्वामीराज ।
परी देहरुपेहि येतात आज ।
निसर्गास त्यांनी पराभूत केले ।
म्हणूनी तयांना मना अर्पियेले ।। २ ।।

अयोनिज ऐसा असे जन्म त्यांचा ।
कधी जन्म कोठे असे कां शिवाचा ? ।
अवतार हाचि असे त्र्यंबकाचा ।
स्वयंभूच साक्षात् दत्तात्रयाचा ।। ३ ।।

कधी दाविती रूप ते शंकराचे ।
कधी दाविती रूप विश्वंभराचे ।
कधी अन्नपूर्णा कधी विष्णुकांता ।
कधी शारदा वा कधी कालिमाता ॥ ८ ॥

कधी मारुतीच्या महारुद्र रुपे !
देती मला ते स्वये दर्शनाते ।
चिरंजीव चैतन्य ऐसे जगाचे ।
असे मारुतीच्या स्वरूपी प्रभूचे ॥ ५ ॥

कुणा दाविती रूप ज्ञानेश्वराचे ।
कुणा गोमटे रूप ते विठ्ठलाचे ।
जसा भक्त सांगे तसे रूप घेती ।
असे स्वामियांची अशी दिव्य शक्ती ॥ ६ ॥

अशा शक्तिशाली महादैवताची ।
करावीच भक्ती अती दृढतेची ।
कृपापात्र होतां स्वयें स्वामि देती ।
हवे जे मनुजा तसे सर्व देती ॥ ७ ॥

## सगुण दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय

जसे सूर्यबिंब भाती प्रसन्न ।
तशी स्वामियांची प्रभा ती प्रसन्न ।
प्रभा मंडलांच्या महामंडलात ।
उभे विष्णुरुपीच स्वामी समर्थ ॥ १ ॥

जशा अग्निशीखाच आरक्तवर्णी ।
तशी कांति त्यांची असे ती सुवर्णी ।
परी शीतलांग जणु चंदनाचे ।
पदी चंद्रबिंब वसे अमृताचे ॥ २ ॥

पहा उंच आणि तशी भव्य मूर्ती ।
आजानुबाहु शुभलक्षणार्थी ।
आकर्ण नेत्री झरे रत्नकांती ।
तशी कुंडलाची असे दिव्य दीप्ती ॥ ३ ॥

शिरीं टोप त्यांच्या असे रेशमाचा ।
माणीक रत्नांसवे मौक्तिकांचा ।
अशा वैभवाचा पहा राजयोगी ।
जणूं द्वारकेचा उभा राजयोगी ॥ ४ ॥

स्फटीकासवे कंठी रुद्राक्षमाळ ।
तशी पोवळ्यांची रुळे सोनमाळ ।
असे पाचुची मुद्रिका अंगुलीत ।
दुजी मुद्रिका शोभते माणिकांत ।। ५ ।।

कटी लंगोटी हे असे एक वस्त्र ।
दुजे अंबराचे असे दिव्य वस्त्र ।
शुक सारखे पूर्ण वैराग्य त्यांचे ।
जणू धूम्रवर्णी अशा शंकराचे ।। ६ ।।

करा स्थिर दृष्टी पदी हो तयांच्या ।
हृदी स्पर्श व्हावा तयांच्या पदांचा ।
असा ध्यास ठेवा मनी तो ज्वलंत ।
कृपापात्र होऊनी व्हा भाग्यवंत ।। ७ ।।

सकाळपासून चिंतन-जप-काव्य यामुळे मन अगदी प्रसन्न झाले होते. शरीर अगदी टवटवीत व हलके झाले होते. आरसा समोर नव्हता. पण काही तेज भाल प्रदेशावर विलसते आहे याचा अनुभव घेत होतो. डोळे तेजाने भरलेले होते. काहीतरी विलक्षण-दिव्यतेची प्रचीती येत होती. ती शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे स्वामी बाहेर कुठे नव्हतेच तर अंतरंगातच होते. स्वामींशी खेळणे झाले. आता आपल्या घरी काय होत असेल ? सर्वजण एकत्र आले असतील. स्वामींची पूजा यथासांग मनापासून केली असेल, पुरण पोळीचा नैवेद्य झाला असेल. माझी आठवण करून-माझे वतीनेच स्वामींना नैवेद्य दाखविला असेल. आता सगळे-सायंकाळी दर्शनास येणाऱ्यांची व्यवस्था करण्यात मग्न असतील. दुपारी ४ पासूनच भक्त येतात. रात्री ९ पर्यंत भक्त येतच असतात. आता हे स्वामीचे भक्त येणार. त्यांचे स्वागत उभे राहूनच केले पाहिजे म्हणून उठलो आणि प्रवासास सुरुवात केली. श्रीराम हा जप चालूच होता. मनाने एकेकाची आठवण करीत होतो. आणि ज्यांची ज्यांची आठवण केली असेल तो निश्चित प्रसादास आला असेल.

चालत चालत दुर्ग तर पार केले. इच्छा अशी होती की आज मारुतीचे मंदिर मुक्कामास मिळावे. कारण स्वामींनी दर्शन देऊनच सांगितले होते ' मी महारुद्र हनुमान आहे. मी चिरंजीव आहे.' माझा यावर पूर्ण विश्वास आहे सर्वजण स्वामींना दत्ताचे पूर्णावतार मानतात

हेही खरे आहे कारण स्वामी कोण नाहीत हे सांगता येणे शक्य नाही. एकात अनंत !! चालता चालता भिलाई सेक्टर नं. २ मध्ये आलो आणि तेथे कळले की जवळच श्रीहनुमान मंदिर आहे. आनंद झाला. हनुमान मंदिर आहे त्या आवारांत सर्वच देवतांची मंदिरे आहेत. राम आहे, कृष्ण आहे, विष्णु आहे, लक्ष्मी आहे, शिव आहे, पार्वती आहे, दुर्गा आहे आणि हनुमान आहे. मध्य आणि उत्तर प्रदेशांत मगळवार हा मारुतीचा वार मानतात, त्यामुळे आज गर्दी फार होती. सर्व देवतांचे दर्शन घेतले आणि एका ओटयावर येऊन बसलो !

आता ९ वाजत आले. आपल्याकडे सर्वांना प्रसाद मिळाला असेल. पण आपणांस काही मिळू शकणार नाही. लस्सी व उसाचा रस यावर उपवास केला होता. प्रसाद म्हणून पेढे घ्यावयास हवे होते. पण आता पेढे कुठे मिळणार ? ९ वाजून गेले होते. मंदिरातील गर्दी ओसरु लागली होती. स्वस्थपणे श्रीराम श्रीराम म्हणत होतो. थोडया वेळाने एक गृहस्थ मजसमोर येऊन उभे राहिले. कुणी परका माणूस दिसतो म्हणून त्यांनी चौकशी केली व म्हणाले मी आता देवदर्शन घेतो. मी बरे म्हणालो. त्यांनी देवदर्शन घेतले व ते निघून गेले. थोडया वेळाने ते आले. सरळ माझ्याकडेच आले. हातात चांदीचे ताट होते. त्यावरचा रुमाल त्यांनी काढला व ताट मजसमोर धरले. ताट कसे संपन्न !! पुरणाची पोळी, केशरी पेढे, बदाम, पिस्ते, काजू, बेदाणा, खडीसाखर, खारका-आणि ग्लासभर केशरी दूध ! हा तर महान मल्लाचा खुराक ! मी थोडे सर्व घेतले. दूध मात्र पूर्ण घेतले आणि ताट त्यांना परत केले. ते नमस्कार करुन लगबगीने निघून गेले. स्वामींना त्यांच्या मुलाची काळजी !! मी अगदी चकित झालो विस्मित झालो या देहाला स्वामीनी पावन केले. सन्मार्ग दाखविला ! पण स्वामींनी या बाळाची सतत काळजी घ्यावी !! अंतःकरण अगदी भरुन आले ! आनंद शब्दांत काय प्रगट करणार ? कसे प्रगट करणार !!

श्रीराम मंदिराच्या ओटयावर श्रीराम श्रीराम असे कूजन करीत पहुडलो.

# अध्याय ८ वा

# जॉली वॉकर

सकाळी ५ वाजता उठून सर्व देवतांना नमस्कार केला. स्वामींचे स्मरण केले. आणि श्रीराम श्रीराम म्हणत पाऊले पडू लागली. कालचा आनंद फार मोठा होता पण आनंदात मशगूल होऊ नये. Do not rest on past laurels जे मिळाले आहे त्याहून अधिक दिव्य मिळविण्यासाठी प्रयत्नशील रहावे ही पुरुषार्थांची शिकवण आहे. देवाची कृपा लाभली असेल तर आपण स्वत: देव होणे हा पुढचा मार्ग आहे. देव होणे म्हणजे लोकांकडून नमस्कार करून घेणे नव्हे तर लोकसेवा करणे ! माझे स्वामी मला अशीच बुद्धी देतात. हेच त्यांचे थोरपण ! !

भिलाईचे क्षेत्र विशाल. ते पार केल्यावर कुंभारी गांवामध्ये एक तलाव आहे. तेथे स्नान–विश्रांती. सायंकाळ झाली होती. तेव्हा रायपूरचे वेशीवर आलो होतो. थोड्या वेळाने कॉलेजचे मोठे मैदान आले. (Play ground ). विशाल मैदान आहे. तेथेच मुक्काम ठोकला. रात्रं चे ९।। झाले असावेत. जागाच होतो. समोरून ४ कॉलेज स्टुडट्स आले. सिगारेटचे झुरके चाललेच होते. मला पाहून ते हिंदीत म्हणाले, ' तुम कौन है ? यह धर्मशाला है क्या ?' असे काही बडबडले. मी झटकन उत्तर दिले.' " Young boys, I am your Grand Father. First throw away the cigars, then speak with me." अरे हा तर इंग्लिशमध्य बोलतो. आपापसांत ते काही कुजबुजले आणि निघून गेले. मी निर्धास्तपणे झोपलो. सकाळी रायपूर शहरांत प्रवेश केला. श्री. शांताराम सराफ यांना भेटलो. पोस्टातून टपाल घेतला. घरची सर्वांची पत्रे होती. आणखी १०।१२ पत्र मित्रांची होतीं. उत्तरे तेथेच लिहिली.

दुपारी ४ वाजता रायपूरच्या वेशीवर आलो. रायपूर ते आरंग मार्ग. पुढे जाण्यापूर्वी जरा चहा घ्यावा म्हणून एका स्वच्छ हॉटेलात शिरलो. तेथे ८।१० कॉलेज विद्यार्थी बसले होते. हॉटेल म्हणजे कॉलेज विद्यार्थ्यांचे गप्पांचे व विश्रांतीचे ठिकाण! त्यांना जरा मोकळेपणा मिळतो. पण एक दाढीवाला म्हातारा त्याच हॉटेलमध्ये शिरावा हे त्यांना नापसंत होते. त्यांच्या कपाळावर आठ्या उमटल्या. मी त्यांची कशाला पर्वा करू! मी रुबाबात एका खुर्चीवर जाऊन बसलो. त्यांना वाटले मी कुणी भिकारी आहे. फुकटात चहा ढोसेल आणि मग मालकाची गयावया करेल. म्हणून ते तिरस्काराने पहात होते. मला जरा इतरांपेक्षा जास्त दिसते! मी समोरचा Rate–Board वाचला. भावफलक वाचला.

**जनता चहा -- २५ पैसे (तेव्हा जनता राज्य होते.)**

**स्पेशल चहा – ३५ पैसे**

**बादशाही चहा – ५० पैसे**

**अमिरी चहा— ६० पैसे**

आणि **जॉनी वॉकर चहा—७५ पैसे**

सर्व चहा मला माहित होते. पण हा जॉनी वॉकर चहा नवीन होता. वेटरला तशी ऑर्डर मोठ्याने दिली. कॉलेज विद्यार्थ्यांनी ते ऐकले. ते फिदी फिदी हसू लागले. पण त्यांना हे माहित नसावे; Who laughs last laughs the best. जॉनी वॉकर चहा टेबलावर आला. मीं घोट घोट पिऊं लागलो. चहा घोट घोट आणि हळू हळू पिणे हे सभ्यतेचे मानले जाते. आता त्या विद्यार्थ्यांचे पूर्ण लक्ष माझ्याकडे होते. हे पाहून मी म्हणालो, " My young friends, I have preferred Jonny Walker tea, because, I am a Jolly Walker " हे वाक्य त्यांना फार आवडले. ते एकदम माझ्या टेबलाभोवती आले आणि त्यांनी विचारले Jolly Walker म्हणजे काय? मी त्यांना म्हणालो, ' Just walk with me for a mile & you will smile.' आता ते इतके खूष झाले होते की, त्यांनी माझे चहाचे पैसे दिले. फक्त मला मालकाची गयावया करावी

लागली नाही. ते सारेजण मजवरोबर १ मैल आले. त्यांना मजेदार काही किस्से सांगितले आणि शेवटी त्यांचेकडून ।। राम लक्ष्मण जानकी। जय बोलो हनुमानकी ।। हे भजन करुन घेतले. प्रथम मी मुंबईचा व पायी जगन्नाथपुरीला चाललो आहे हे सांगितल्यावरच ते चीतपट झाले होते.

विद्यार्थ्यांना निरोप दिला. अंधार खूप झाला होता. आता मुक्काम करावयास हवा होता. दोन्ही बाजूला कॅनॉल होते. म्हणजे दोन्हीकडे जमीन ओली असणार ! सरळ पुढे चालत राहिलो. अमावास्या होती. दाट अंधार होता. कॅनॉल संपेना-वस्ती दिसेना. Jolly Walker आहे ना ? मग चालत रहावे आणि थोडयाच वेळात एक इंजिन डावीकडून आले, उजवीकडे गेले आणि त्या उजेडात एक शाळा दिसली. शाळेचा ओटा दिसला टॉर्चच्या उजेडात तेथे गेलो. ओटयावर पिशवी ठेवली तेथे एक गृहस्थ उभे होते. त्यांना विचारले या ओटयावर पिशवी ठेवली तर चालेल ना ? ते गृहस्थ म्हणाले, 'अहो, हा शाळेचा ओटा आहे. त्याला कशाला परवानगी हवी ?' पण नंतर ते म्हणाले, 'वाहेर कशाला झोपता ? आत झोपा. मी त्यांना म्हणालो, 'घरांत त्रास कशाला ? उन्हाळा तर आहे !' पण त्यांनी पिशवी उचललीच त्यांचे मागे आत गेलो. एका पलंगावर वसलो. त्यांनी पाणी आणून दिले. जेवणाबद्दल विचारले. मी काही नको म्हणून सांगितले. लाकडी पलंगावर झोपण्याची व्यवस्था होती. मी त्यावर चटई टाकली आणि पहुडलो.

झोपण्याच्या जागेची विवचना होती परंतु झोगावयास लाकडी झोपाळा मिळाला. त्याभोवती मोगऱ्याचा ताटवा. त्याची फुले सुगंध विखुरीत होती. आकाशात आज चांदण्यांचे साम्राज्य होते. आज अमावास्या. चंद्र नव्हता, म्हणून चांदण्या अधिक लुकलुकत होत्या. पण त्यांना सुगंध नव्हता. मोगऱ्याच्या फुलांपुढे चांदण्यांचा काय दिमाख राहणार ? एखाद्या सम्राटासारखा झोपलो. सुगंधी झोप मिळाली.

दोन मोगऱ्याची फुले घेऊन पहाटे ५ वाजताच प्रवासास सुरुवात केली. ५।। ला चांगले उजाडले. ६।। वाजता-रस्त्यावर एक हॉटेल लागले. १ टेवल, २/३ खुर्च्या, ३–४ कपबश्या, एक शेगडी. जोड धंदा

म्हणून सायकलमध्ये हवा भरण्याचा पप. या वर्णनावरुन धंद्याची कल्पना येईल. तेथे खुर्चीवर जाऊन बसलो. फक्कड चहा सांगितला. कल्पना नव्हती इतका चांगला चहा मिळाला. १ रु. ची नोट टेबलावर ठेवली. मालकाने कृपवशी उचलली. नोट त्यांच्या हातात देऊ लागलो तर त्याने नोट काही घेतली नाही तो म्हणाला, 'बाबा, पैसे राहू द्या.' मी म्हणालो, 'अरे, तुझा धंदा आहे.' उत्तर मिळाले, 'धंदा मालिकका है.' आकाशाकडे बोट दाखवीत तो म्हणाला ! गरिबाच्या अंत:करणातील काय हा भाव ! ! चहाच्या पैशाचा प्रश्न नाही हा मनाच्या धारणेचा प्रश्न आहे. तो म्हणाला, 'तुम्ही देवाच्या दर्शनाला निघाला. तुमच्याकडून पैसे घेणे पाप आहे.' मी यात्रेकरू आहे, त्याने ओळखले होते तर ! ! त्याने सर्व चौकशी केली. त्याला आनंद झाला. त्याचा निरोप घेतला. कल्याण होवो असा आशीर्वाद दिला. आरंग-मग अखंड ज्योति मंदिरात दुपारची विश्रांती. महानदीवर स्नान करुन-घोरारी येथे मुक्काम. रस्त्यावर सारे जगलच आहे. पर्णहीन वृक्ष !

घोरारीनंतर महासमुंदचा फाटा फुटतो. माझा रस्ता सरळ तुमगांवकडे होता. तुमगांवनंतर श्री खिल्लारीमातादेवीचे मंदिर-हा सारा प्रदेश रुक्ष जंगलाचा आहे. रान संपतच नाही. अचानकपूरचे पुढे जंगलच आहे. कुठे वस्ती नाही. बराच आत गेलो होतो. नवागांव ८-१० मैल तरी असावे. एका वळणावर-एक शीखच एकदम पुढे आला. माझे स्वागत केले. आणि म्हणाला, 'चला जरा विश्रांती घ्या.' समोर लहानसे हॉटेल व त्या पलीकडे मजुरांच्या ४।५ झोपड्या त्याच्या हॉटेलसमोर अंगण वृक्षांची सावली. बसण्यासाठी खाटा ! त्याने उत्तम चहा दिला. त्याने चौकशी केली. मी माहिती सांगितली. तो रायपूरहून बसमधून येत होता. तेव्हा त्याने मला पायी चालतांना बघितले होते. आग्रहाने त्याने मला मुक्काम करावयास लावले. रात्री फक्त दूध घेतले. पैसे घेईना. सकाळी पाहू असं तो म्हणाला. 'सकाळी मी ४ वाजताच निघतो.' असे मी त्याला सांगितले. 'तुम्ही झोपले असाल. मी केव्हाच निघून जाईन' तो म्हणाला, 'नाही. त्यावेळी मी जागा राहीन.' रात्री २ वाजताच ते कुटुंब उठल. शुचिर्भूत

झाले. स्नान केले. चूल सारवली आणि माझ्यासाठी पोळ्या-भाजी तयार केली. ३॥ ला मला हाक दिली. मी उठलो. सकाळचे कार्यक्रम त्याने आटोपले. स्नानास गरम पाणी. धोतर वाळण्यासाठी पसरले. कपडे केले, तर माझ्यापुढ नास्ता तयार ! पहाटे ४॥ ला नास्ता. पण कुटुंबाचे समाधानासाठी नास्ता घेणे आवश्यक होते. प्रत्येकाच्या काही भावना असतात. दुपारसाठी पोळ्या भाजी यांचे पुडकेही बांधून दिले. त्यांचे चिरंजीव बचनसिंग-वराहगढ येथे असतात. त्यांचा पत्ता घेतला. लहान नातूही आहे. हे कुटुंब पैसे घेत नव्हते. वराहगढला नातवाला खाऊ देऊ असे ठरविले. ५ वाजले. तसा मी निघालो. सरदारजी १ मैलभर मला रस्ता दाखविण्यासाठी आले. त्यांचे आभार मानले.

जंगलातून मी चाललो होतो. रस्त्याल सारा शुकशुकाट होता. किर्र रान. जप मात्र चांगला चालू होता. जंगल असले तरी सूर्यप्रकाश असतोच. नवागाव-झोलप असे करून सायंकाळी पिथोरा येथे आलो. भाऊ भोजनालयांत जेवलो. जेवण चांगले मिळाले. वर्तमानपत्र वाचण्यास मिळाले शिवमंदिरात झोपलो. वारे फार जोराने वहात होते. पिथोरा पहाटे ५ ला सोडले. प्रवास झपाट्याने होत होता. श्री. दयानिधी प्रधान यांनी मला रस्त्यात पाहिले. त्यांनी पुढे येऊन माझी भेट घेतली. त्यांनी थोडी पदयात्रा केलेली होती. ते मला त्यांच्या घरी साल्हेतराई येथे घेऊन गेले. जेवण झाले. पदयात्रेतील अनुभव त्यांनी सांगितले. पढरीच्या वारी सारखे. बसना येथे येण्यास रात्रीचे ९ वाजले. श्रीराम मंदिरात मुक्काम केला

आता बसना ते सरायपल्ली प्रवास सुरु. आता मध्य-प्रदेशाची हद्द संपणार ! प्रवासास खूप वेग आला होता. २० कि. मी. प्रवास केव्हाच झाला. तलावावर जाऊन स्नान, कपडे धुणे हे कार्यक्रम आरामशीर झाले. स्टँडवर भोजन घेतले. पण भोजन चांगले नव्हते. जवळच चांभार होता. त्याला पिशवी शिवण्यास सांगितली. त्याने मजकडे पाहिले. पिशवीवरून त्याने ओळखले की मी पदयात्री आहे. सर्व संवाद हिंदीतून झाला. पण मी मराठीतून देत आहे. चांभार : 'बाबा, आपण कुठले ? कुठून आला-कुठे चालला ?'

मी : 'मी मुंबईचा (कारण त्याला ठाणे कळले नसते)–
जगन्नाथपुरीला चाललो आहे.'

चांभार : त्याने मला आपादमस्तक पाहिले व म्हणाला, 'छे, हे शक्य
नाही. हे सारे अशक्य आहे.'

मी स्तब्ध राहिलो. मजजवळ काही महाराष्ट्राच्या किंवा मध्यप्रदेशाच्या मुख्यमंत्र्याचे शिफारसपत्र नव्हते. काही पुरावा नव्हता. माझा देवही साक्षर नव्हता ! गप्प रहाणेच बरे. फक्त मी मनातल्या मनात हंसत होता. आनंद असा वाटला की चांभारही आता बुध्दीनिष्ठ झाला आहे ! थोडया क्षणांनी तो चांभार म्हणाला, 'बाबा, म्हणजे तुम्ही खोटे आहात असे मी म्हणत नाही ! पण तुम्ही हजार मैल चालत आलात, तुमचे पाय सुजलेले नाहीत. हात सुजलेले नाहीत. तुम्ही थकलेले–भागलेले, भुकेलेले दिसत नाही. त्रासलेले दिसत नाही. अगदी ताजेतवाने दिसत आहात. ताठ उभे आहात. प्रफुल्ल दिसत आहात. छे, देवाशिवाय असे कुणी असणारच नाही ! तुम्हीच माझे ठाकूर (देव कृष्ण) आहात !' आणि त्याने चटकन पाय धरले. मी मनातल्या मनात त्याला आशीर्वाद दिला. त्याने पिशवी शिवून दिली. पैसे घेतले नाहीत. 'देवाकडून पैसे घेणे हे पाप आहे.' उलट त्याने विचारले, 'बाबा, एक ग्लास लस्सी घ्याल का ?' मी थक्क झालो व म्हणालो, 'अरे मी थकलेला नाही–भुकेलेला नाही. मग मला कशाला लस्सी ?'

**वृथा वृष्टि समुद्रेषु–वृथा तृप्तस्य भोजनम् ॥**

तेथे आता गर्दी होऊ लागली म्हणून त्याचा निरोप घेतला. एक गरीब चांभार ! छे छे हा तर जगन्नाथ.

**येईल तो जगन्नाथ । सोडुनी त्या आसनाला ।**
**भेटुनीया वाटेमध्ये । नेईल तो नगरीला ॥**

# अध्याय ९ वा

सरायपल्लीहून सकाळी शिजरा येथे आलो. तेथून पुढे सारे जंगल आहे. उजाड जंगल आहे. रुक्ष उजाड जंगल. जवळजवळ ८ मैल जंगल आहे. उन्हाने रस्ता तापलेला. पर्णहीन वृक्ष. जणू तपश्चर्या करीत उभे आहेत. वैराग्य काय असते याची कल्पना येते. पण अशा उन्हातान्हातही बागडत होती ती वानरसेना ! त्यांना उन्हाचा त्रास काही जाणवत नसावा. मला त्यांचा काही त्रास झाला नाही. जणू मला रिझवण्यासाठीच त्यांची क्रीडा चालली होती. कदाचित् माझ्या वैखरीतून व हृदयातून श्रीराम श्रीराम हा ध्वनी त्यांना ऐकू येत असावा. कृष्णाच्या मुरलीने जसे सर्वांना आकर्षित व प्रमोदित करावे–तसेच श्रीराम श्रीराम या नामात काही सामर्थ्य निश्चित आहे. मला उन्हाचा काही त्रास वाटला नाही. तसेच महाराष्ट्र, मध्यप्रदेश ओलांडून आपण आता तिसऱ्या प्रांतात ओरिसात प्रवास करीत आहोत असा परकेपणाही वाटला नाही. भारतभूमीच्या कणाकणात एकच जीवनरस असणार नाही का ? उलट आपण आता जगन्नाथाचे जवळ जवळ चाललो आहो याचे समाधान होते. वाटेत एक निर्मळ झरा लागला. पाणी अगदी शीतल व गोड होते तृप्तता लाभली आता पुढे झाडी सुरु झाली. निसर्गाची योजना पहा कशी असते त्या योजनेत किती वात्सल्यता असते. जंगल रुक्ष जंगल पार केल्यावरोबर थंड पाण्याची सोय !

सायंकाळी लोहाराचट्टी येथे आलो. मध्यप्रदेश, ओरिसा यांच्या सरहद्दीवरची ही चौकी. चौकीकडे जरा पहात राहिलो तोच चौकीदार बसरुद्दीन खान हा पुढे आला. मला बसण्यासाठी लगेच एक खाट आणली. पाणी आणले चहाची व्यवस्था केली. हा प्रेमळ व्यवहार ओळखीशिवाय का झाला ? बसरुद्दीन खान राहणारा जगन्नाथपुरीचा होता म्हणूनही असू शकेल. चहाचा दुकानदार गुजानिधी सत्पथी याने

माझी सर्व व्यवस्था केली. ओरिसाच्या सरहद्दीवर या यात्रेकरुचे स्वागत तर फार आत्मीयतेने झाले

दुसरे दिवशी सकाळी ओरिसात प्रवास सुरू झाला. सोहेला पार करून दुपारी विश्रांतीसाठी एका वृक्षछायेत थांवलो रस्त्यावर काम करणारे मजूरही काम आटोपून तेथेच आले त्यांनी अगदी आपुलकीने चौकशी केली. आम्ही स्नान करून येतो मग आमच्या वरोवरच जेवावे हे त्यांचे निमंत्रण मी स्वीकारले. १।।/२ मैल लांव जाऊन ते स्नान करून आले. मग त्यांनी माध्यान्हीच्या सूर्याला नमस्कार केला. आम्ही सर्व जेवावयास बसलो. मोडके तोडके माझे हिंदी त्यांना थोडे फार समजत होते इतक्या लांबून मी पायी चालत आलो याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. मी त्यांना सांगितले पायाने चालावयाचेच असते. त्यात विशेष पराक्रम नाही पण कुणी सायकलने, मोटार सायकलने, मोटारने लांवचा प्रवास केला तर ते कौतुकाचे असते. त्यांनी प्रश्न केला की, पण कष्ट किती होतात ? आणि हे कष्ट आपण का घेता ? त्यांच्या प्रश्नाचे मला कौतुक वाटले ! माझ्या कष्टाचे, चालण्याचे त्यांना काही अचाट काम वाटत होते. म्हणून मी त्यांना सांगितले की, सवयीने सर्व जमते. सडकेवर आपण जे काम करता ते मी ५ मिनिटेही करू शकणार नाही. धगधगते ऊन, उकळते डांबर यात काम करणे कितीतरी अवघड आहे पण आपण ते करता, तें स्वतःच्या, कुटुंवाच्या पालनपोषणासाठी, कारण कुटुंबावर आपले प्रेम आहे, माझे देवावर प्रेम आहे, कुटुंबावर प्रेम आहे, समाजावर प्रेम आहे, मातृभूमीवर प्रेम आहे.

।। लोकमानसी देव शोध तू मग भेटे श्रीपती ।। ठायी ठायी मला देवमाणसे भेटतात. त्यांच्या अंतरंगातील देव मला दिसतो आणि या दर्शनाने मी आनंद लुटतो सर्वात एकच देव. एकच आत्मा आहे म्हणून तर त्या मजुरांनी मला त्यांच्यावरोवर जेवावे म्हणून आग्रह केला ही आत्मीयता मोठी रमणीय असते भात आणि उकडलेल्या कैऱ्यांचे पाणी हा त्यांचा आहार पण तो किती गोड असतो. जणू विदुराघरच्या कण्या ! हे सारे विचार मनाला आनंद देत होते आता मजूर परत कामासाठी उठले आणि मीही पुढील मार्गक्रमणा सुरू केली, अर्थात् त्या मजुरांना नमस्कार करून ! मजूरही माझ्या चालीकडे पहात होते

मजरांच्या सहवासात आनंद लाभला–म्हणून चालण्याला गती आली होती. अंतराचे आणि वेळेचे भान नव्हते. वाटेत एक मोठा कॅनॉल लागला, म्हणून थबकलो. चांगली जागा पाहिली. विपुल पाणी–स्नान केले. कपडे धुतले. सूर्य अस्तास जात होता त्याला अर्घ्य दिले. कपडे वाळेपर्यंत–आकाशातील सौंदर्याचे निरीक्षण करीत होतो. किती विविधता! किती रम्यता! किती भव्यता! रात्र झाली. अंधाराच्या पलिकडे आकाश–आकाशाच्या पलिकडील दिव्य प्रकाश यांचे दर्शन घेत–तेथेच झोपलो.

दुसरे दिवशी पहाटे उठून पुढे ८ कि. मी. वर वराहगड लागले. अचाकनपूरला भेटलेल्या शीखाच्या नातवाला खाऊ द्यावयाचा होता. त्या शीखाने आदरातिथ्य उत्तम केले होते. तपास केला. घर सापडले, त्या नातवाची आजी तेथेच आलेली होती. तिने लगेच ओळखले. चपात्या आणि लोणचे यांची न्याहारी झाली. दूध झाले. नातवाला खाऊ दिला आणि पुढे निघालो. रस्त्यात जुगलकिशोर देवता ही व्यक्ती भेटली. त्या व्यक्तीला एकदम मला भेटावे असे वाटले. अगदी जणू जुने मित्र असे आम्हास वाटले. जुगलकिशोरने पुढील मार्गाची आणि जगन्नाथपुरीची खूप माहिती सांगितली. ऊसाचा रस दिला. आज पोट भरले होते. म्हणून चालतच राहिलो. दोन्ही बाजूस वृक्षराजीही होती. दलदलीचा प्रदेश होता. भाताची शेती होती. नारळाच्या बागा होत्या. कोकणची आठवण झाली. अट्टाबारापर्यंत प्रवास झाला. गांव अगदी बाजारी. रस्त्यात खूप गर्दी. अट्टाबारा गावाच्या बाहेर आलो. दलदलीचा प्रदेश. पुढे हायस्कूलचे पटांगण लागले. तेथे मुक्काम केला. त्या हायस्कूलचा रखवालदार किशोरकुमार पंड्या लागलीच धावत आला. त्याने बाक आणून ते नीट लावून पलंग तयार केला. त्याला हिंदी येत नव्हते, मला ओरिआ भाषा येत नव्हती. खुणांनी बोलणे चालू होते. पहाटे ४ वाजता स्नानासाठी त्याने गरम पाणी आणले मग चहा आणला निघताना त्याने २ फुले दिली आणि नमस्कार केला. किशोरकुमारचे माझे काय नाते! दोन्ही देवाची लेकुरे!

अट्टाबाराहून पहाटे निघालो. आता दलदल कमी झाली होती. हवा कोरडी होती. कुणीतरी वाटेत सुचविले. जरा उजव्या बाजूस वळा पाच सहा मैलावर महानदी लागते. तेथे होडीत बसा. नदीपार व्हा. तेथून जगन्नाथपुरी जवळ आहे. जवळ जवळ ५० मैल अंतर वाचेल. पण पायी जावयाचे तर होडीचा आधार का घ्यावा? अतर लांब पडले तरी हरकत नाही म्हणून चालत राहिलो. बुराला गांवच्या दिशेनें गेलो. तेथून ४।५ मैलावर हिराकुड प्रचड नी प्रसिध्द धरण आहे हे धरण पहावे अशी इच्छा झाली पण डोळयासमोर जगन्नाथ हे एक ध्येय असताना अन्य आकर्षणे टाळली पाहिजेत. आध्यात्मिक जीवनात अशी सुंदर आकर्षणे येतात. परंतु केवळ सत्य हेच एकमेव आकर्षण मानून त्यावरच मन केन्द्रित करावे चालता चालता महानदी लागली. अगदी जवळजवळ कोरडी अशी. परंतु तिचे पात्र मात्र इतके विशाल की, तिच्या पात्रात अवाढव्य, अक्राळविक्राळ शिलाखंडाचे डोंगरच पुरे उभे आहेत. जेव्हा या डोंगरांना पोटात घेऊन जलप्रवाहाचे प्रपात झेप घेत असतील तेव्हा किती रौद्ररुप प्रकट होत असेल ! महानदीचा पूल किती उंच ! किती लांब आहे ! त्या भव्यतेचा अंदाज बांधता येत नाही.

संबळपूरला तर आलो. फार थकलो होतो. लस्सी घेतली. टपाल घेण्यासाठी गावात शिरलो. संबळपूर एवढे मोठे शहर. व्यापारी पेठ पण अगदी गलिच्छ गाव. पोस्टात जाऊन पत्रे घेतली. जामात श्री. दाते, धुळे येथील नटवरलाल श्रॉफ व कु. तेजा भिडे यांची पत्रे मिळाली. श्री. दाते यांच्या पत्रात घराकडील सर्व कुशल वृत्त होते. पत्रे लिहिली आणि महादेवाच्या मंदिरात थोडा मुक्काम केला. गलिच्छ गावात मुक्काम करू नये असे वाटले. मनेसरच्या रस्त्यावरील एका चांगल्या जागेत मुक्काम केला सकाळी मनेसरकडे प्रवास सुरू केला. ओरिसामध्ये एक प्रथा आहे. सकाळी नदीवर–कॅनालवर स्नान करून ओल्या कपड्यांनीच महाकालीची स्तोत्रे म्हणत माणसांचे थवेचे थवे रस्त्यावरून चालत असतात ! स्नानाचे महत्व ओरिसामध्ये विशेष आहे. दुसरे एक लक्षात आले की, ६०% लोकांना हत्तीरोग झालेला आहे. पण त्यांना त्याचे काही वाटत नाही. साधारण जंगलातूनच प्रवास चालू होता. हवा मात्र जरा कोरडी

होती. दलदल कमी होती. प्रत्येक २।३ मैलावर चहाची लहान लहान दुकाने आहेत. वाटेत मनेसरचा डाक बंगला लागला. तेथे खूप गर्दी होती मिनीस्टर वगैरे कुणी आलेले नव्हते. कारण मोटारींचा ताफा नव्हता. अपघात वगैरे काही झाला आहे की काय म्हणून आत शिरलो. तरुण डॉक्टरांचा कॅम्प होता. १०।१२ डॉक्टर्स होते. नागरिकांची मोफत तपासणी चालू होती. औषध लिहून देणे चालू होते. मी जरा धाडस केले. एका डॉक्टरशी हस्तांदोलन केले आणि त्यांचे कौतुक करून त्यांना एक प्रश्न विचारला. अर्थात् इंग्रजीशिवाय दुसरी भाषा नव्हती. ६०% लोकांना हत्तीरोग आहे. यावर आपण काय उपचार करता ? संशोधनामध्ये यावर अद्याप औषध नाही. उपाय म्हणजे ऑपरेशन-पण तोही खात्रीचा नाही. मी सांगितले. त्यावर औषध आहे. उपाय आहे पण तेथे डॉक्टरांची काही आवश्यकता नाही. रोग्याने स्वतःच तो उपचार करावयाचा असतो. शिवाय तो उपचार देशी आहे ! तंबाखूचे हिरवे पान जांघेमध्ये रात्रभर बांधून ठेवणे हा तो उपचार आहे. २ महिने उपचार करावा. या उपचारात आधुनिकता कुठे आहे? आणि डॉक्टरांचे वैभव वाढविण्याला हा उपचार काही उपयुक्त नाही. त्या तरुण डॉक्टरांना काही नाविन्य वाटले. त्यांनी परिचय करून घेतला. दाढीवाला एक पदप्रवासी, खेडवळ कपडे असलेला हा माणूस इंग्लिशमध्ये बोलतो आणि तेही मेडिसिन्स्बद्दल ! त्यांना कौतुक वाटू लागले त्यांनी एक टेबलमध्ये ठेवले सभोवती १२ डॉक्टर्स बसले. आमचे चहापान झाले. त्यांनी मजसमवेत फोटो काढून घेतला जेवणास रहाण्याचा आग्रह केला. मी सॉरी म्हणालो. माझा आहार साधा. त्यांच्या आहारात non असलेच पाहिजे मग त्यांनी विचारले, ' तुम्ही उन्हातान्हात प्रवास करीत आहात तर तुमच्याबरोबर कोणती औषधे देऊ ?' डॉक्टरांचा प्रश्न जिव्हाळ्याचा होता, म्हणून मी प्रथम thanks दिले आणि एकदम एखादा बाण सूं सूं करीत निघावा–किंवा बंदुकीची गोळी अचानक वेगाने सुटावी–तसे शब्द एकदम उमटले, ' Doctor, the man who worships The Sun, needs no Medicine. या वाक्याचा वेग आणि शक्ती अशी होती की, हे वाक्य स्वामींनीच किंवा एखाद्या देवानेच उच्चारले असावे आणि हे किती सत्य आहे तेही मला लगेच उमगले.

अकाल मृत्यु हरणं सर्वव्याधिविनाशनं
सूर्यपादोदिकं तीर्थं जठरे धारयाम्यहम् ।।

सतत २ महिने मी उन्हातान्हात चाललो होतो. हातातील दण्ड तापेपर्यंत चालत होतो. उघड्या शेतात झोपत होतो. रोज २५-३० किलोमीटर कमीत कमी चालत होतो. मिळेल ते खात होतो. कधी उपास घडत होते. पण मला Aspro, अॅनासिनची गोळीही लागली नाही. कधी हातपाय गळले नाहीत. कधी राग आला नाही. निसर्गाच्या सान्निध्यात ही जादू असते. किती मोकळे, किती विशाल ! त्यामुळे मनही विशाल होते आता Blocks च्या कोंडवाड्यात कोंडून घेण्याची राहणी माणसाचा आनंद हिरावून घेत आहे असे वाटते. डॉक्टरांनी मोठ्या प्रेमाने निरोप दिला. सदिच्छा व्यक्त केल्या. त्यांना धन्यवाद दिले. विशेषत: Dr. Ashok-kumar Singh, Dr. Rabindra Pande आणि Dr. Bhupen-dra kishore Naik यांनी खूपच आत्मीयता दाखविली.

# अध्याय १० वा

डॉक्टर लोकांचा निरोप घेऊन निघालो. ३ मैलावर एका मारवाड्याचे दुकान लागले. जरा दाणे गूळ घ्यावे म्हणून त्या दुकानात गेलो. तो राजस्थानातील होता. माझी हिंदी भाषा ऐकून त्याला बरे वाटले. 'उन्हातून चालला, जरा बसा.' असे तो म्हणाला. त्याने दाणे गूळ दिले, पिण्यास पाणी दिले. जेवणाबद्दल विचारले पण मी सांगितले 'डॉक्टरांच्या बरोबर जेवण झाले आहे' खरं म्हणजे डॉक्टरांच्या समवेत बराच वेळ गेला. आताही बराच वेळ जाईल. वेळेलाही महत्व आहे. मग मारवाडीबंधूने विनंती केली की, उन्हातून तुम्ही चालता तर ही छत्री घेऊन जा. मी म्हणालो! 'म्हणजे ती छत्री परत करण्यासाठी परत पदयात्रा करावी लागणार!' तो म्हणाला 'छत्री घेऊनच जा' एक स्वामींचे कृपाछत्र मजवर असताना दुसऱ्या छत्राची आवश्यकता नाही. पांढराशुभ्र मोठा रुमाल डोक्यास बांधला आणि त्याचे आभार मानून पुढे चालू लागलो. वेळ भरून काढावयाचा होता.

३।४ मैल चाललो अत्यंत संताप आणणारे दृश्य पाहिले आणि तिकडे मी धावतच गेलो. २ हरिजन पिण्यास पाणी मागत होते. म्हणून ५-६ जण त्यांच्यावर दगडांचा वर्षाव आणि शिव्यांचा वर्षाव करीत होते. मला कुणाचीच भाषा येत नव्हती मी फक्त खबरदार म्हणून त्या ५।६ लोकांसमोर हातातील दण्ड धरला. जरा रौद्ररुप धारण केले. आणि जय जगन्नाथ जय जगन्नाथ असे ५।६ वेळा म्हणालो. त्यांना मी कुणीतरी साधुसंत वाटलो. ते शांत झाले. मी विहिरीवर गेलो पाणी काढले. आणि त्या हरिजन बंधूंना पाणी दिले. त्यांचे आशीर्वाद घेतले. मग इतर ५ ६ जणांना बोलाविले. त्यांनाही हे गंगाजल आहे म्हणून घ्या असे सांगून पाणी दिले. उपदेश केला नाही. उपदेशाचा काय उपयोग? प्रत्यक्ष कृती परिणामकारक असते. आपलेच ओठ, आपलेच

दात ! पारतंत्र्यापासून अस्पृश्यता वाढली आहे. ओरिसात फार मोठ्या प्रमाणात अस्पृश्यता आहे. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी खरा धर्म, खरा देव लोकांना समजाविला पाहिजे. २ तास तेथेच थांबलो. संबंधित लोक घरोघरी गेल्यावरच मी पुढे प्रवास सुरू केला. सायंकाळी टाका वन प्रकल्पाच्या पायथ्याशी झोपलो. रात्री फार उकडत होते. रात्री वारा बंद होता. त्यामुळे झोप पूर्ण झाली नाही.

सकाळी उठून चारमळकडे प्रयाण. चारमळहून रामपूर. तेथे जेवण करून पुढे निघालो. पुढे १८ मैल जंगलच आहे. दुपारी ३ ते सायंकाळी ६ पर्यंत १८ मैल चालणे अशक्य होते. कुणीतरी सुचविले ८ मैलावर एक महादेवाचे मंदिर आहे आपण तेथे आश्रय घ्या. त्या उद्देशाने चालू लागलो. ५॥ वाजता त्या मंदिराजवळ आलो. त्या मंदिराच्या बाहेर दोन मोटार सायकल–स्वार भेटले. ते म्हणाले, 'तुम्ही ब्राह्मण आहात का?' मी विचारले, 'का?' त्यांनी सांगितले, 'या मंदिरात फक्त ब्राह्मणांना प्रवेश आहे' मी एकदम थांबलो. तेथील पुजाऱ्यास विचारले. त्याने तसेच सांगितले. देव नसलेल्या मंदिराचा आश्रय घेण्यात काय अर्थ. मी परत फिरलो. ते सायकलस्वार म्हणाले, 'जानवे दाखवा आणि प्रवेश करा.' मी त्यांना साफ सांगितले. 'ज्या जागेत भेदाभेद आहे. तेथे देवच नसतो.' ते म्हणाले, 'मग तुम्ही झोपणार कुठे? येथे रात्री श्वापदे येतात. येथे झोपणे धोक्याचे आहे.'

मी त्यांना सांगितले, 'माझे तत्व जर सत्य असेल तर देव माझे रक्षण करील. आपण आपल्या मार्गाला लागा.' ते जरा रागीट चेहरा करून निघून गेले.

मी एका झाडाखाली येऊन बसलो. स्वामींचे ध्यान करीत बसलो. हिंदु समाजातील या भेदाने मन विषण्ण मात्र झाले होते. थोड्याच वेळात एक युवक समोर आला. त्याने गुडघ्यापर्यंत धोतर नेसले होते. त्याने माझी पिशवीच खांद्यावर घेतली व म्हणाला 'बाबा मजबरोबर चला. मी आपली सर्व व्यवस्था करतो.' तो पुढे मी मागे असे २ फर्लांग गेलो. तेथे ५।६ झोपड्या होत्या जंगल ठेकेदाराची एक खोली होती. ती त्यान स्वच्छ केली. समई लावली. झोपड्यातील सर्व मजुरांनी माझी जेवणाची व्यवस्था केली. मी त्यांना तेथेच जेवणास बोलाविले.

पण कुणाचे बोलणे मला कळत नव्हते. खुणेने सर्व व्यवहार चालू होता. सर्वांनी नमस्कार करून निरोप घेतला. त्यातील महिलांनी १० फुटां-वरून खाली वाकून नमस्कार केला. ती नमस्काराची पद्धत काही औरच होती. मराठीत योग्य शब्द मला अद्याप शोधता आला नाही. It was a graceful manner सर्वजण गेल्यावर मी चटई पसरली आणि सुखात आडवा झालो. देवळातील महादेवच देऊळ सोडून माझ्या व्यवस्थेला आला. सत्य तत्वाचे सामर्थ्य इतके विलक्षण असते. शांत झोप झाली. उजाडल्यावर सर्वांचा निरोप घेऊन निघालो. कारण रस्ताच माहीत नव्हता. गुडघ्यापर्यंत धोतर नेसलेला तो युवक आणि महिलांचा graceful manner चा नमस्कार मात्र चांगलाच लक्षात आहे.

सकाळी बामपूर, दण्डाप्पा असा प्रवास झाला. सर्वत्र जंगलच आहे. रात्री बायन्डा येथे गावाबाहेर मुक्काम. वारे अंगाला झोंबत होते. मधून मधून जाग येत होती. जाग आली की रामनाम मुखाने चालू असावयाचे व दृष्टी आकाशाशी बोलत राही आकाशात आणि आका-शाच्या पलीकडे जे आहे त्यात वृत्ती तल्लीन होई व झोप लागे.

दि. १० मे ची सुप्रभात उजाडली. माझ्या नातवाचा आज वाढ-दिवस. (मोठ्या कन्येचा पहिला मुलगा) चि. अमीतच्या वाढदिवसाला आम्ही सर्व एकत्र येत असतो. आज मी येथे १४०० मैलांवर. सर्वांना व विशेपत: चि. अमितला माझी आठवण येईल. मी निघतांना सर्वांना सांगितले काही गोड धोड प्रवासांत मिळाले नाही तरी २ आंबे तरी खाईन. तुम्ही वाढदिवस चांगला साजरा करा. सकाळी प्रवासास सुरूवात केली. रस्त्याने आंबे शोधू लागलो. लहान लहान गावातून जातांना आंबे शोधले. रस्त्यावरील झाडांवर आंबे शोधले आंब्याचा मोसम असून एकही आंबा दृष्टीस पडू नये याचे आश्चर्य वाटले. मन खिन्न झाले. शेपुरपाडा गाव लागले. तेथेही शोध घेतला. १२॥ वाजता एका हॉटेल-मध्ये शिरलो. २ गुलाबजाम खाल्ले. काहीतरी गोड खाऊन अमितचा वाढदिवस साजरा केला. एका छायेत शांतपणे बसलो. समोर डाकबंगला होता. तेथून एक व्यक्ती मजजवळ आली. विचारपूस करून त्यांनी मला डाकबंगल्यात बोलाविले. लिंबाच्या झाडांच्या गार छायेतच आम्ही खुर्च्या

टाकून बसलो. त्या गृहस्थाचे नाव गिरीशचंद्र प्रधान होते, Educational Inspector होते. त्यांनी विचारपूस केली एकटे पायी प्रवास का करता? मी सांगितले मी एकटा नाही, मी स्वामींबरोबर चालत आहे, नव्हे त्यांच्या कडेवर बसून जात आहे. साहजिकच न दिसणारे हे स्वामी कोण ही पृच्छा त्यांनी केली. मी लगेच त्यांना फोटो दाखविला आणि ते एकदम म्हणाले 'हे तर आमच्या आजोबांचे दैवत. आमचे घरी असा फोटो आहे.' बाकी त्यांना स्वामींची काही माहिती नव्हती. ४ वाजता मी पुढे प्रवास सुरू केला. तत्पूर्वी त्यांनी चहा दिला

मी वरकलच्या दिशेने चालू लागलो पण ऊन फारच कडक लागले. प्रवासाची गती मंद झाली. झाडे कमी होती सायंकाळी चचपाडा नावाचा एक लहानसा पाडा लागला. रस्त्यावर ३।४ लहान चहाची दुकाने होती पण दूध संपलेले होते. प्रत्येकजण जरा थांबा, जरा थांबा असे म्हणू लागला. अंधार पडू लागला. मी पुढे जावयाचे असे ठरविले. आणि पुढे २ पाऊले टाकली. तेवढयात खांद्यावर कुणीतरी हात ठेवला. एक तरुण खेडूत पण सुहास्य वदनाचा हा युवक हिंदीतून बोलू लागला. 'बाबा येथेच थांबा.' लगेच त्याने माझी पिशवी घेतली. आणि चालू लागला. मी झपाटल्यासारखा त्याचे मागे चालू लागलो. रस्त्यात त्याला मी विचारले, दूध वगैरे काही मिळेल का ? त्याने उत्तर हिंदीत दिले. जेथे ठाकूर आहे तेथे काय मिळणार नाही ? ठाकूर म्हणजे कृष्ण ! पाडयाच्या बाहेर आल्यावर एक मंदिर लागले मंदिराच्या दिंडीवर त्याने थाप मारली. पुजाऱ्याने दार उघडले. मी आत शिरलो. तो तरुण मात्र गायब ! पुजाऱ्याने स्वागत चांगले केले. सतरंजी घातली. पिण्यास गोड थंड पाणी दिले. हातपाय धुऊन मी बैठकीवर वसलो पुजाऱ्याने दूध आणून दिले. सायंकाळची माझी उपासना केली. ८ वाजता आरती-साठी उठलो श्रीकृष्णाची हंसरी वेणूधारी मूर्ति पाहून फार आनंद झाला. आरती फार चांगल्या रीतीने झाली, प्रसाद घेतला. पुन्हा बैठकीवर वसलो. थोडया वेळाने देवळाच्या ओटयावर माझे पान मांडून पुजाऱ्याने मला जेवण्यास बोलाविले.

हात पाय धुऊन श्रीकृष्णास नमस्कार केला. पानावर बसलो. मन प्रसन्न झाले. भले मोठे केळीचे कोवळे पान, पानावर गरम गरम

भात, चटणी, मीठ आणि आळूच्या पानांची पातळ भाजी आणि समोर दोन पिकलेले आंबे ! दोन आंबे पाहून मनीचा भाव उचंबळला गरम भाताची वाफ येत होती. त्या वाफेला म्हटले, ' वये, लवकर उंच उंच जा. सारे डोंगर पर्वत ओलांडून तडक मुंबईस जा. बाँबे सेंट्रल येथील Reserve Bank Staff Quarters मधील × × या Block मध्ये जा, तेथे गर्दी असेल, रोषणाई असेल, लहान लहान मुलांचा थवा असेल, त्यामधील अमित नावाचा मुलगा तुला निश्चित ओळखू येईल. त्याच्या कानात जाऊन त्याला हळूच सांग – ' तुझ्या नानांनी आज दोन आंबे खाल्ले.' सकाळपासून जे मिळत नव्हते ते सहज मिळाले. किती सहजपणे मिळाले. ठाकूर आहे तेथे काय उणे ? जेवणाने तृप्त झालो. ढेकर आली. पुजाऱ्याचे आभार मानले. अंगणात येऊन चटईवर पसरलो. श्रीराम श्रीराम म्हणता म्हणता गाढ झोप लागली.

सकाळची आरती झाली. लोणी खडीसाखरेचा नैवेद्य मिळाला लोणी खड साखर मला फार आवडते. पुजाऱ्याचा निरोप घेतांना त्यांना विनंती केली की, काल ज्या युवकाने मला येथे आणले त्याचे घर मला दाखवा. त्याला बक्षीस दिली पाहिजे, त्याचे आभार मानले पाहिजेत. माझे कितीतरी मनोरथ त्यामुळे पूर्ण झाले. वसतीला उत्तम जागा. श्रीकृष्णाचे दर्शन, उत्तम जेवण आणि २ आंबे.

पुजारी म्हणाला, ' अहो, तुम्ही एकटाच आला. तुमच्याबरोबर कुणीच नव्हते.' मी क्षणभर स्तिमित झालो. मग उमजलो, कारण असे अनुभव मला भरपूर आले आहेत.

**॥ स्वकरें चंदन घासी । गंगेचे पाणी कावडी भरीतो ॥**

**देव भक्ताची सेवा करतो.**

श्रीकृष्णास पुन्हा नमस्कार केला आणि प्रवासास सुरुवात केली. पाड्याच्या बाहेर पडतांना वेडे मन त्या युवकाचा शोध घेत होते पण व्यर्थ.

परमेश्वराचे निर्गुण रूप जाणता आले तरी सगुणरुप दिसावे अशी उत्कंठा असतेच आणि ते इतक्या विविध रुपांत नटलेलें असते की मन हरपून जाते ! !

# अध्याय ११ वा

चचपाडा सोडताना 'जेथे ठाकुर आहे तेथे काय मिळणार नाही ?' हे वाक्य हृदयावर कोरले गेले. ५।६ मैलावरचे वरकल केव्हाच आले. तेथे एक देवीचे मंदिर आहे. ती महाकाली आहे. तेथे एक भक्त तन्मयतेने देवीची पूजा करीत होता. मी त्याचे मागे जाऊन बसलो. अर्गला–स्तोत्र म्हणू लागलो. देवीची आरती झाली. नंतर मी पुढे निघणार इतक्यात त्या पुजाऱ्याने मला थांबविले. नास्ता दिला. फारच उत्तम नास्ता होता. त्याला धन्यवाद देऊन पुढे निघालो.

अंगुलच्या बाहेर नदीत स्नान केले. अंगुल गावातून बनारपालच्या रस्त्याला लागलो. बनारपालचे आसपास मोठे प्रकल्प आहेत. त्यामुळे वाहतूक-रहदारी फार होती. अजितकुमार शाहू- Educational Inspector यांचा परिचय झाला. दुसरे दिवशी धनकनलकडे निघालो. दुपारी १२॥ वाजता बलरामप्रसाद हे गाव लागले. तेथे चहा घेतला. जवळ कुठे झाडी दिसत नव्हती म्हणून त्या हॉटेलातच बसलो. शेजारी सायकल दुरुस्तीचे एक दुकान होते. त्या दुकानाचा मालक शत्रुघ्न महाराणा भेटीस आला. नंतर त्याने आपले दुकान आवरले. अगदी स्वच्छ केले आणि मला विश्रांती घेता यावी म्हणून बैठक घातली. मला त्याने तेथे बसविले, आराम करा म्हणून सांगितले आणि तो घरी गेला. त्याच्या दुकानाची जागा अगदी हवेशीर होती. मंद मंद वारा वहात होता. जणू काही वातानुकूलित खोली होती. फारच छान विश्रांती मिळाली. एक तासाने शत्रुघ्न परत आला. हातात भले मोठे पातेले होते. ते माझे समोर ठेवले. त्यात शिरा होता. २-२॥ शेर शिरा पाहूनच माझे पोट भरले शत्रुघ्नाने फार आग्रह करून शिरा दिला. शिरा काजूचा होता. रव्यापेक्षा काजूच जास्त होते. मग त्याने तो शिरा सभोवतीच्या सर्व दुकानदारांना दिला.

सर्व दुकानदार मग भेटीस आले. या २५।३० जणांशी कोणत्या भाषेत बोलणार ! पण थोडे फार शब्द हिंदीतून बोलत होतो व त्यानुसार खुणाही करत होतो.

त्या खुणांची भाषाच त्यांना जास्त कळत होती. आज मुक्काम तेथेच करावा असा सर्वांचा आग्रह होता. शत्रुघ्नचे वडील बंधू आले, त्यांचाही फार आग्रह. सायंकाळी त्यांच्या घरी जावेच लागले. स्नानासाठी भले मोठे दगडी घंगाळे, १५।२० बादल्या पाणी. केळीच्या पानाची बाग. उन्हाळ्यात इतके विपुल पाणी स्नानास मिळाले, फार आनंद झाला. रात्री चांदण्यात झोपलो. एखाद्या बादशहासारखा झोपलो. पहाटे ५ वाजता मार्गस्थ झालो. वेशीपर्यंत शत्रुघ्न बरोबर होताच. गावाचे नाव बलरामप्रसाद. यावरून अर्थबोध होत होता पण पुरावा काही हाती नव्हता. आणि माझ्या मित्राचे शत्रुघ्न नाव मला फार आवडले. नावात कठोर व्यंजने फार असूनही ते नाव मधुर वाटले. कदाचित काजूच्या शिऱ्याचा तो परिणाम असेल किंवा हवेशीर जागा विश्रांतीसाठी मिळाली म्हणून असेल पण शत्रुघ्नचा विनय, गोड वागणे मनावर बिंबले हे खरे !

बलरामप्रसादहून पुढे निघालो. 'श्रीराम श्रीराम' म्हणत पाऊले झपाट्याने पडत होती. निसर्ग प्रसन्न होता. सूर्योदयाची मजा पहात होतो. अग्नीत टाकलेल्या सोन्याचा गोळाच जणू ! हिंडोलला नास्ता केला. पुढे निघणार इतक्यात पावसाच्या सरी आल्या. पाऊस थांबताच निघालो. आता आमराई सुरू झाली. हवेतही थंडावा आला होता. पाऊस पडल्यामुळे रस्ता निसरडा झाला होता. पाऊले जपून टाकावी लागत होती. चाल मंद झाली होती. पण त्यामुळे रस्त्यावरील आंब्याच्या झाडाच्या कैऱ्या तोडत होतो, खात होतो. घरी फोडी करून कैरी खाणे आणि हाताने कैऱ्या तोडून चालत चालत कैऱ्या खाणे यातील फरक कळला. मधून मधून पाऊस येत होता. हवा पावसाळी झाली होती. ऊन अजिबात नव्हते. वनराजी मात्र फुलली होती. सर्वत्र हिरवेगार होते. अशावेळी चांगले मोठे सर्प इकडून तिकडे हिंडत होते. चांगले पिवळे जर्द सर्प ! मला भीती वाटत नव्हती पण जपून चालावे लागत होते.

इंडिपूर येथे दोन मित्र भेटले. श्री. लंबोदर शाहू आणि श्री. बंकानिधी शाहू. त्यांनी आंबे, पपई यांचा उपहार दिला. त्यांना वाटले आपणही जगन्नाथपुरीला पायी जाऊ या. त्यांना पदयात्रा ही कल्पना फार आवडली पदयात्रेंने देव भेटतो का ? मला आधी ईश्वर-दर्शन झाले. मग पदयात्रा झाल्या. त्यामुळे मी निश्चित उत्तर कसे देणार ? देव सत्कर्मांनी भेटतो इतकेच मला अनुभवास आले होते. पण ईश्वर समाजाच्या, निसर्गाच्या अनंत रूपांत भरलेला आहे. त्याचा शोध करण्यासाठी, त्या अनंत रूपाचे दर्शन घेण्यासाठी पदयात्रा कराव्यात इतकेच मी त्यांना सांगितले. त्यांचा निरोप घेतला त्यांनी डझनभर आंबे पिशवीत कोंबले. सर्वत्र वृक्ष होते. त्यामुळे ऊन लागत नव्हते. कुणी लहान मुले रस्त्यात भेटली तर त्यांना आंबे देत होतो. ओझे कमी करत होतो.

हिंडोल येथे आलो. एकदम हवेत बदल झाला आणि क्षणांतच धो धो पाऊस सुरू झाला. कुठे झाडाचा आश्रय घेतला तरी भिजणारच व वेळही वाया जाणार तेव्हा चालत रहावे असाच निर्णय घेतला. ओलेचिंब होण्यातही एक मजा असते. धारा कोसळत होत्या. शॉवरबाथ घेत होतो निसर्ग स्नान घालत होता. वारा घोंगावत होता, जणू तू चालतोस कसा हे आव्हान मला होते. आव्हान आले की, मला स्फुरण येते. मी अगदी निश्चयी होतो. शेवटी वरुण राजा शांत झाला. वायुही स्थिर झाला वातावरण निवळलं आणि समोर महादेवाचे मंदिर दिसले महादेवाचे दर्शन घेतले. कपडे काढून अंग पुसले. समोरच सरोवर होते. त्यात कपडे धुतले – वाळत टाकले. महादेवास जलाभिषेक केला. ।। ॐ त्र्यंबकं यजामहे ।। स्वामींची प्रार्थना, रामरक्षा असे सर्व पठण झाले. नंतर सरोवरचे काठी बसलो. अंधुक प्रकाशात सरोवराचे सौंदर्य पहात होतो. संधीप्रकाशाची पिवळी किरणे पाण्याच्या पृष्ठभागावर नाचत होती. पांढरी कमळे टवटवीत दिसत होती. मासे खेळत होते. सरोवर अगदी निर्जन होते. सारे सौंदर्य मीच प्राशन करीत होतो. एखाद्या कमळा-तून लक्ष्मी प्रकट होते का म्हणून पहात होतो. अंधार दाटला. पुजारी

आला. त्याने दीप लावला. माझी चौकशी केली. त्याने गावात चला म्हणून विनंती केली. सरोवर असले, महादेवाचे मंदिर असले तरी गर्द झाडी होती. झाडी भयाण होती. तेथेच मुक्काम करण्याचा माझा निश्चय होता. भयाणता काय आहे ? भीती काय आहे ? वन्यपशूंची भीती काय आहे ! लोक का भितात ? सारे अनुभवावे. मी त्याचा अनुभव घेतला. जो एकटा असतो तो भीतो. जो फक्त एकटयाचाच म्हणजे स्वतःचाच विचार करतो तो भीतो. ज्याने काही पाप केले असेल तो भीतो ! मी एकटा नव्हतोच. स्वामी मजबरोबर होते आणि सांबही होता. मग मला भीती कशी वाटणार ? शिवाय भीती देहाला असते. आत्म्याला भीती नसते. मी तर विदेही होऊनच चाललो होतो ! रात्री शांत झोप झाली.

सकाळी स्नान करुन शंकरास जाईची फुले वाहिली. 'श्रीराम श्रीराम' म्हणून पाऊल पुढे टाकले. धनकनल येथे नास्ता घेतला. पोस्टात गेलो. पत्रे घेतली श्री. टकले (चित्रकला प्रवीण), रविंद्रनाथांचे चहाते यांचे पत्र मोठे व चांगल्या विचाराचे होते. त्यांचा अध्यात्मिक क्षेत्रातही अधिकार आहे. पत्रे वाचून मार्गस्थ झालो. हवा खूप थंड होती. दुतर्फा झाडी होती. प्रकाश होता. पण ऊन नव्हते. आता मध्ये कुठे गांव नव्हते. वस्ती नव्हती. दुपारी वृक्षांच्या छायेत विश्रांती. सायंकाळी एका शेतांत मुक्काम केला. मोकळ्या जागेत झोप चांगली येते. सकाळी चौद्वारकडे आगेकूच. दुपारी महादेवाच्या मंदिरात विश्रांती. सायंकाळी कटकच्या मार्गावर एका शाळेच्या अंगणात विश्रांती. जवळच महानदीवर बांधलेले धरण आहे. त्याचा प्रचंड आवाज रात्रभर येत होता. दुसरे दिवशी सकाळी उठून ते धरण ओलांडून कटककडे चालू लागलो. धरणावरून चालताना कानठळ्या बसणारा आवाज घुमत होता. त्याला मी रामनामाने उत्तर देत होतो. सूर्य उगवला. त्याला नमस्कार केला. कटक जवळ येत चालले. परत महानदीवरील पूल लागला. पूल १ मैलाचा तरी असावा. महानदी प्रवासात तीनदा लागते. एकदा अथांग मग रौद्र आणि आता अगदी शांत, स्वच्छ, विशाल पात्र. या विशाल पात्रातून महानदीचे पाच प्रवाह तरल स्वरूपात वहात होते. पाणी अगदी पारदर्शक होते. किती उंचावरून नदीचा तळ स्पष्ट दिसतो. चमकणारे लहान लहान मासे रत्नांसारखे चमकत होते.

कटक हे फार मोठे Automobile Centre ! Automobile चा उद्योग म्हणजे पंजाबी लोकांची गर्दी. बाकी मला शहरात काही रमावयाचे नव्हतेच. पोस्टातून पत्रे घेतली. पादत्राणे फाटली म्हणून ती घेतली आणि भुवनेश्वरकडे निघालो. कटक पासून ग्रामीण वातावरण संपते. औद्योगिक आणि शहरी वातावरण सुरू होते. रहदारी सुरू होते. भुवनेश्वराच्या अलिकडे ६ मैलांवर एका शेतात झोपलो. दुसरे दिवशी सकाळी भुवनेश्वराकडे निघालो. रस्त्यावर सर्वत्र बागा आहेत. पाणी विपुल आहे या जमिनीत ऊस मात्र होत नसावा. फळ भाज्यांचे मळेच आहेत. भुवनेश्वर ही ओरिसाची नवी राजधानी. तिचा अफाट विस्तार, फार दुरवरून राजधानी दिसते. पण प्रत्यक्षात फार दूरवर आहे. भुवनेश्वराच्या हद्दीवर राधास्वामी सत्संगाचे कार्यालय आहे. श्री अनुकूलचंद्र यांचा तो सत्संग आहे. सहज तेथे गेलो. अनुकूलचंद्रांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले अनुयायांच्या ओळखी झाल्या. अनुकूलचंद्रांचे विचार फार उत्तम आहेत पण ते नीट समजले पाहिजेत. गीता, ज्ञानेश्वरी यातीलच ते विचार आहेत. पुढे भुवनेश्वर पोस्ट ऑफिस, विधानसभा पाहून भुवनेश्वरच्या बाहेर पडलो. वेशीवर भुवनेश्वरी मंदिर आहे. शिल्प पहाण्यासारखे आहे. दर्शन घेऊन पुढे निघालो. वाटेत अचानक पाऊस सुरू झाला. उत्तराधाक (कौसल्यगंगा) येथे संध्याकाळ होईपर्यंत पोहोचलो. श्री. भाग्यरथी खटाई यांची ओळख झाली.

कौसल्यगंगेहून निघालो. रस्त्यात पिपली म्हणून छोटेखानी पण स्वच्छ गाव लागते. तेथून कोणार्कला फाटा फुटतो पिपली येथे जरा विश्रांती घेतली. मग साक्षीगोपालला आलो. साक्षीगोपाल या नावावरूनच तेथे कृष्णाचे मंदिर असावे हे आपल्या लक्षात येते. मंदिर चांगले आहे. मुख्यत: रासक्रीडा महिन्यातून एक दिवस असते. तेव्हा अलोट गर्दी असते. तेथून पुढे चंदनपुरी. आता जगन्नाथाच्या दर्शनाची विलक्षण ओढ लागली होती. चंदनपुरीला रात्रभर झोपच आली नाही. जगन्नाथाचे वेध लागले होते. उत्सुकता दुथडी भरली होती. ज्यासाठी निघालो त्याची पूर्तता उद्या होणार होती !

॥ लोक मानसीं देव शोध तु मग भेटे श्रीपती ॥

पदयात्रा करताना समाज समजत होता. देवमाणसे भेटत होती. आता श्रीपती भेटणार होता. त्याच्या भेटीसाठी मन आसुसले होते. बेटा, जगन्नाथाला चल असे स्वामी का म्हणाले याचे ज्ञान उद्या होणार होते. त्या ज्ञानाची उत्कटता उद्या कळणार होती. औत्सुक्य मनात आणि देहात सळसळत होते. झोप लागणार तरी कशी ? पहाटेची वाट पहात होतो. 'श्रीराम श्रीराम' स्पंदन श्वासागणिक होत होते.

# अध्याय १२ वा

चंदनपुरीहून भल्या पहाटे निघालो. जगन्नाथाच्या दर्शनाची विलक्षण ओढ लागली असल्यामुळे पाऊले झपाझप पडत होती. चंदनपुरीहून जगन्नाथपुरी केवळ १४ कि. मी. वर आहे. निम्मे अंतर चालून येताच मंदिराचा कळस दिसू लागला. मन हर्षोत्फुल्ल झाले. ठीक ७॥ वाजता पुरीच्या वेशीवर आलो आणि स्वामींनी प्रेरणा देऊन मार्गदर्शन केले. प्रथम नगराला प्रदक्षिणा घालावी, समुद्रस्नान करावे आणि मग दर्शन घ्यावे. त्याप्रमाणे प्रदक्षिणा व समुद्रस्नान केले. City of Temples असे पुरीचे नाव प्रसिद्ध आहे. जगन्नाथपुरीचा संक्षिप्त नामनिर्देश केवळ पुरी या नावाने होतो. प्रदक्षिणा घालतांना पत्नी, मुलगा, मुली, जामात आणि लाडका नातू अमित यांची आठवण झाली. कर्णावती (अहमदाबाद) ते रत्नागिरी, मुंबई, हुबळी, ठाणे ते अक्कलकोट, नागपूर, जबलपूर, झांशी, दिल्ली, इंदौर या विस्तीर्ण प्रदेशातील १५०० स्वामीभक्तांच्या व माझ्या सन्मित्रांच्या घरी मनाने जाऊन आलो, नव्हे त्यांना बरोबर घेऊनच प्रदक्षिणा घालीत होतो. सर्वांचा जिव्हाळाच हा माझ्या जीवनाचा आनंद ! त्यांच्यासह समुद्रस्नान केले. वाटेत जे जे भेटले त्यांनाही बोलाविले. विशेषत: सावली देणारी गाय, अपघात टाळणारा शेतकरी, बॉलपेनची भेट देणारी वृद्ध माता, दूध देणारे सारे, जावयाचे कौतुक करणाऱ्या आई, शालक, मेव्हण्या, वेळेवर जेवण देणारे शेतकरी, पाणपोई चालविणारे गावकरी, कारंजाचे श्रीनृसिंहसरस्वती, संत तुकडोजी महाराज, भर उन्हात उकळणाऱ्या डांबरी रस्त्यावर अनवाणी उभे राहून देवाच्या गोष्टी ऐकण्यात रममाण होणाऱ्या भगिनी, त्यांचे गोकुळ, रस्त्यावर काम करणारे मजूर, अचानकपूरचा शीख, सरायपल्लीचा जगन्नाथरूपी चांभार, ' धंदा

मालिकका है।' हे सांगणारा मुन्नतलाल, Jolly walker म्हणजे काय हे उत्सुकतेने जाणणारे कॉलेज विद्यार्थी, चचपाडचा ठाकूर दाखविणारा तो अनामिक, झोपण्याची व्यवस्था करणारा तो जंगल कामगार, Graceful manner ने नमस्कार करणाऱ्या त्या भगिनी, काजूचा शिरा देणारा शत्रुघ्न,–ठायीठायी भेटणारी देवमाणसे या साऱ्यांच्या समवेत मी चौकातील स्तंभाजवळ आलो. हा अरुण स्तंभ आहे. पूर्वी कोणार्क येथे होता. आता जगन्नाथाच्या मंदिराच्या प्रवेशद्वारावर त्याची स्थापना झाली आहे.

त्या स्तंभावर डोळे टेकले. खूप रुंद असा रस्ता आहे. हा रथ-यात्रेचा मार्ग आहे. त्या मार्गावर अंगातून घामाच्या धारा वहात असणारे मजूर पाहिले. त्यांच्या दर्शनाला प्रथम गेलो पिढ्यान् पिढ्या हाच त्यांचा उद्योग. ऊन, वारा, पाऊस यात दिवस रात्र रथ तयार करणे हेच त्यांचे जीवन ! त्यांचा हा श्रमयज्ञ पाहून मी चकित झालो. दर ३ वर्षांनी नवे रथ करतात. ३ नवे रथ करतात. ते रथ इतके भव्य असतात की एकेका चाकाचा व्यास १२ फूट असतो. एका रथाला ६ चाके असतात त्यांच्या श्रमाचे प्रतीक रथाचे चाक. त्यावर डोके टेकले. ईश्वराच्या दर्शनाला पायरी पायरीने जावयाचे असते. पहिली पायरी ते मजूर. दुसरी पायरी रथाचे चाक आणि मंदिराच्या ४२ पायऱ्या चढलो पूर्वाभिमुख मंदिराच्या प्रथम दालनास भोगमंदिर म्हणतात. तेथे भात अर्पण करावयाचा असतो नंतर नाट्यमंदिर. येथे नृत्य गायन चालते. देवाला आळविणे असते. नंतर रंगमंदिर. जगन्नाथाच्या दर्शनासाठी भक्तांनी थांबावयाचे असते. सर्व दालने झपाझप पार करून मी जगन्नाथासमोर गेलो. ज्याचेज्याचे स्मरण केले त्या सर्वांच्या वतीने साष्टांग नमस्कार घातला. धन्यतेने त्या मूर्तीकडे पहात राहिलो. धन्यतेने प्रतिभा फुलली. प्रतिभेचे कमळ फुलले. अष्टदलाचे कमळ उमलले.

ध्वज स्वामींचा आज उभविता पावन या क्षेत्रीं।
फुलली मन्मतीं धवल यशाची अपूर्व ती तृप्ती।
तृप्त होऊनी वंदन करितो आज जगन्नाथा।

सर्व समर्पण करितो करितो चरणी घालूनी दंडवता ।।
महद्भाग्य हे दिधले मजला माझ्या स्वामींनी ।
कृपा तयांची येता स्मरणीं नयनीं ये पाणी ।
पुत्र आपुला मानुनि मजवर करिती प्रेम किती ।
कशी सांगु ह्यो शब्दांनी त्या प्रेमाची महती ।।

शब्दांची ही रानफुले आहेत. पण त्यांचा सुगंध समर्पणाचा आहे. तो सर्वात गोड सुगंध आहे. जगन्नाथाचे दर्शन व तेही पदयात्रेने करण्याचे महद्भाग्य स्वामींनीच दिले. सारे श्रेय त्यांच्याच चरणी समर्पण आणि ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहाय्य केले त्या सर्वांना कृतज्ञतेने अभिवादन !

मंदिर कसे आहे, अलंकार कसे आहेत, मूर्ती कशा आहेत हे पहाण्या कडे माझे लक्षच नव्हते. या बाह्यरंगाचे मला आकर्षणच नाही. लक्षावधी लोकांची श्रद्धा जेथे अर्पण केली जाते तेथेच परमेश्वर असतो मग तो एक धूलीचा कणही असू शकेल. तेथे साष्टांग प्रणिपात करणे यातच धन्यता असते.

जगन्नाथाची थोरवी जर कशात असेल तर येथे भेदाभेद नाही. सर्वांना मुक्त प्रवेश आहे. येथे सत्य प्रगट झाले आहे.

आज २० मे १९७९, माझ्या जीवनातील एक अपूर्व दिवस. जगन्नाथाचे दर्शन घेऊन मुक्कामाला शंकराचार्यांच्या मठात आलो. नंतर पोस्टांत जाऊन टपाल घेतले. ६०।७० पत्रे घेतली. मुलाचे, पत्नीचे, कन्यांची पत्रे होती आणि मजवर लोभ करणाऱ्या सन्मित्रांचीही पत्रे होती.

अपेक्षेपेक्षा माझा प्रवास लवकर झाला. दि. २२ ला सौभाग्यवती, चि. सौ. उज्वल (२ री कन्या) व जामात श्री. दाते जगन्नाथपुरीस येणार आहेत. तेव्हा तोपर्यंत पुरीस थांबणे आवश्यकच आहे. दि. २० २१ दोन दिवस पुरी हिंडलो. दंतकथा ऐकल्या. जगन्नाथाचे दर्शन रोज घेत होतोच.

समुद्रकिनारा-शांत बसण्यासाठी होताच. सर्व पत्रे वाचण्यास २ दिवस लागले. मित्रांचा स्नेह शब्दाशब्दातून प्रकट होत होता. मनाला फार आनंद होत होता. २ दिवस केव्हाच गेले दि. २२ ला सौभाग्यवती, चि. सौ. उज्वल व श्री. अरविंदराव हे सर्व ठरल्याप्रमाणे आले. त्यांच्या-समवेत जगन्नाथ, इतर मंदिरे, साक्षीगोपाल व कोणार्क वगैरे स्थळांना भेटी दिल्या. दि. २५ ला जगन्नाथाचा निरोप घेतला व आम्ही सर्व कोणार्क एक्सप्रेसने ठाण्यास परत आलो.

पुढील अध्यायात जगन्नाथपुरीचे दर्शन, वर्णन आणि नंतर फलश्रुती सांगीन. वाचकांनो—फलश्रुती विचारपूर्वक वाचा हीच विनंती.

# अध्याय १३ वा

दोन दिवस जगन्नाथपुरीत हिंडलो. एक रथमार्ग सोडला तर बाकी रस्ते अरुंदच आहेत. चारी धामांपैकी हे एक प्रमुख क्षेत्र आहे. जगन्नाथाची यात्रा ही शेवटची यात्रा असते. नीलाचल डोंगरावरून स्वर्गाचे द्वार लागते. दंतकथा विपुल आहेत. प्रत्यक्ष पुरावा हाती लागणे कठीणच. परकीय आक्रमणे होत होती. कुणीतरी मूळ मूर्ति समुद्रात सुरक्षिततेसाठी बुडविली. दुसऱ्या कुणाने तप केले. विष्णु प्रसन्न झाले. त्यांनी सांगितले अमुक दिवशी लाकडाचे ओंडके समुद्रातून वहात वहात येतील. त्याच लाकडाच्या तीन मूर्ति तयार कर व त्यांची स्थापना कर. त्याप्रमाणे ३ लाकडाच्या मूर्ति आहेत. श्रीकृष्ण, सुभद्रा आणि बलराम! दर १९ वर्षांनी नवीन ओंडके समुद्रातून येतात. त्यांच्या मूर्ति केल्या जातात, जुन्या मूर्तींचे विसर्जन होते.

मूर्ति काही सुंदर नाहीत. पण लोकांची श्रद्धा सत्यावर असते. सौंदर्यावर नसते. लाखो लोकांची हजारो वर्षे श्रद्धा जगन्नाथावर आहे म्हणून तर त्याला जगमोहन म्हणतात. सुवर्ण, रत्ने, माणके यांचा दिमाख येथे नाही. तुलसीमालांचे वैभव येथे आहे. भेदाभेद न पाळणारे, न मानणारे हे दैवत आहे. साऱ्या ओरिसांत अस्पृश्यता आहे पण जगन्नाथाजवळ मात्र ती नाही.

मंदिर भव्य आहे. ३०० फुटाची एक भिंत अशा ४ भिंतींत मंदिर उभारलेले आहे. भिंतीची जाडी ६ फुट आहे. मंदिराचा हा तटच आहे. भिंतीवरील शिल्प आणि चित्रे सुंदर आहेत. कळस २१५ फूट उंच आहे. खालून वर दृष्टी पोहचत नाही. चारी दिशेला ४ भव्य दरवाजे आहेत. दक्षिण दरवाज्याच्या बाहेर श्री हनुमानाची भव्य मूर्ति आहे. काळ्या दगडाची ही मूर्ति बलदंड आहे. याची स्थापना श्रीसमर्थ रामदासांनी

केली आहे. उंची १८ फुट आहे. रामदासांनी भारतभ्रमण केले होते याचा हा सबळ पुरावा आहे. जगन्नाथाच्या संरक्षणासाठी ही मूर्ति उभी आहे. रामदासांनी स्थापन केलेला मठ येथे आहे. आता मठाची एक खोलीच फक्त राहिली आहे. पेशवा मठ असे या मठास म्हणतात. चाफळ, सज्जनगड येथे मंदिरे, समाधी बांधणे हे सहज होऊ शकते. पण जगन्नाथपुरीचा मठ बांधणे व तो सांभाळणे हे जीवन–कार्य म्हणून कुणी स्वीकारले तर उत्तम होईल पण काम फार कठीण आहे. मंदिराचे भोवती दुकाने आहेत. दुकानांची गर्दीच आहे. तेथे प्रसाद म्हणून जगन्नाथाचा भात विकत मिळतो. जगन्नाथाला फक्त भाताचा भोग अर्पण करतात. तोच भात वाळवून विक्रीस येतो.

तीर्थक्षेत्र म्हटले की तेथे स्वच्छता कमीच. तीर्थक्षेत्री यात्रेकरूंनी दान करावयाचे असते. त्याप्रमाणे दान घेण्यासाठी भिकारी पाहिजेतच. भिकाऱ्यांची गर्दी आहेच, त्यातच महारोगी फार ! यात काही परिवर्तन करता येणार नाही का ? काही सुसूत्र योजना हवी.

२ मैलांवर–लोकनाथाचे मंदिर आहे. म्हणजे महादेवाचे मंदिर आहे. येथील शिवपिंड नेहमी समुद्राच्या पाण्यातच असते. फक्त महाशिवरात्रीला ती वर येते व दिसते. या पिंडीचे दर्शन ज्यास घडेल त्याच्या सर्व रोगांचा परिहार होतो.

श्रीशंकराचार्यांचा मठ येथे आहे. मठ आहे इतकेच. राहण्याची सोय आहे. राधाकृष्ण, शंकर–पार्वती, आद्य शंकराचार्य यांची लहान लहान मंदिरे मठात आहेत. बाकी वेदाभ्यास वगैरे काही शिक्षण दिले जाते असे आढळले नाही.

मंदिरातील जगन्नाथ हे सत्य व शिव आहे व सौंदर्य विखुरलेले आहे ते समुद्र किनाऱ्यावर ! हा गंगासागर ! या पाण्याचा रंगही निराळा आहे. सूर्योदयाचे वेळी दिसणारे दृश्य नितांत रमणीय आहे. सूर्याची कोवळी किरणे समुद्रतरंगावर जणू नृत्य करीत असतात !

जगन्नाथ आणि जगन्नाथपुरी यांची माहिती मी अपूर्ण देत आहे याची मला जाणीव आहे. संशोधन करणे किंवा यात्रा करणे हा माझा

छंद नाही. जगन्नाथपुरीची पदयात्रा स्वामीनी करवून घेतली ती का यातच माझे मन रमलेले आहे. पायी चालण्याचा विक्रम मला करावयाचा आहे असाही हेतू नाही.

जगन्नाथ म्हणजे गुजराथचा डाकोर–दक्षिणेचा तिरुपती, उत्तरेचा बद्रीनारायण व पंढरपूरचा पंढरीनाथ. यांचे दर्शन म्हणजे निर्भेळ आनंद ! हा आनंद पदयात्रेत होता. अलवणीबुवा (मीठ न खाणारे) जगन्नाथाच्या दर्शनासाठी आले होते. गर्दीत पती पत्नीची ताटातूट झाली होती. भुकेने ते व्याकूळ झाले होते. त्यातच वृध्दापकाळामुळे थकले होते उन्हाने त्रस्त झाले होते. तप्त वाळूने पोळले जात होते. अंगात काही त्राण उरले नव्हते. जगन्नाथाचे आता दर्शन कसे होणार या व्यथेने व्यथित होऊन तळमळत होते. आता प्राण सोडावा अशा भावनांच्या अंतिम निराशेला पोहोचले होते. तोच स्वामीनी त्यांना जगन्नाथाच्या रूपात दर्शन दिले. गोड अन्न दिले, पत्नीची भेट करून दिली आणि सांगितले, 'यात्रा करून परत जा आणि समाजसेवा करीत आयुष्य वेच! !' असेच मार्गदर्शन मला करण्याकरिता स्वामीनी यात्रा करवून घेतली असावी. स्वामींचे पट्टशिष्य बाळप्पा महाराज हेही स्वामींच्या कार्या-साठी बिहार, ओरिसा, बंगाल येथे गेले होते. आज मलाही जगन्नाथ-पुरीला आणले याबद्दल मला आनंद वाटत होता.

पदयात्रेत अपार कष्ट होते. व्यावहारिक दृष्टया तर ते खडतर जीवन होते. पोटाला कधी मिळे न मिळे. वेळेवर चहाही मिळणे शक्य नव्हते ! कुठे पाण्याची वानवा ! ग्रीष्माचे ऊन, उष्ण वारे, मार्गातील चढउतार, भयाण अरण्ये–भकास अरण्ये, श्वापदे–सर्प–चोरांची, लुटारुंची भीती–अशी अनेक संभाव्य संकटे होती. पण स्वामींच्यावरील निष्ठेमुळे सर्व काही दूर झाले होते.

**ईश्वराच्या भेटीसाठी पाउलांचा खेळ चाले ।**
**पाउलांच्या संगे माझ्या आनंदाचा बाग फुले ।।**

आनंदाचा बाग नुसता बहरला होता. सुगंध दरवळत होता, त्याने धुंद होऊनच चालत होतो. १८०० कि. मी. पेक्षा जास्त अंतर

काटले. भारताच्या पश्चिम तटावरून पूर्व तटावर गेलो. रोज कमीत-कमी २४ कि. मी. चाल होत होती. हा वेग काही फार नाही. पण निसर्गात रमून चालत होतो. निसर्गाचे सौंदर्य पहाण्यात थबकत होतो, देवमाणसांच्या सहवासात रमत होतो. मुख्यत: श्रीराम श्रीराम असा ६ कोटी नामजप झाला. याचे सामर्थ्य काही अगणित आहे. स्वामींचे स्मरण तर २४ तास असते. स्वामींनी देह, मन, आत्मा यांना व्यापून टाकलेलेच आहे. २८ लक्ष पावलांनी जगन्नाथ गाठला !

यात्रेतील सर्वात मोठे भाग्य व आनंद म्हणजे भारतमातेचे विशाल दर्शन आणि काळ्या आईच्या कुशीत झोपण्याचे महद् भाग्य ! गावा-बाहेरील शेतात झोपतांना foam च्या गादीपेक्षा मऊ गादी लाभे. भूमाता वसुंधरेचे विशाल रूप पाहून मन भरून येई, त्याहूनही आकाश पाहून मनाची विशालता वाढे. त्या नील नील गगनाच्या पलीकडे प्रतिभा झेपावे. ज्ञानचक्षुंनी अनंताचा शोध घेई. त्यात रममाण होई. चांदण्यांशी खेळण्यात मौज वाटे. मंजुळ वायूलहरी अंगाई गीत गात असत आणि चंद्र चांदण्यांची शाल घालीत असे ! अशा धुंद अवस्थेत झोपत असे. पहाटे पक्षी भूपाळी गात रिझवीत. काय हा अद्भुत आनंद ! देवा-दिकांनाही असा आनंद लाभत नसेल.

सारा आनंद मला मिळे. खरे म्हणजे मी पदयात्रा केली नसून आपल्या लाडक्या बाळाला कडेवर घेऊन जणू स्वामीच जगन्नाथपुरीला गेले असे मला वाटते. म्हणून या पदयात्रेचे सारे श्रेय स्वामींनाच द्यावे. वाचकहो, मग माझे कौतुक कशाला ? पण जनरीती अशी आहे की कडेवरच्या बाळाचे सारे कौतुक करतात ! !

पण मी इतकेच म्हणतो–

**॥ इदं न मम ॥**

**॥ सारे स्वामींनाच अर्पण ॥**

# अध्याय १४ वा

पदयात्रा झाली. धन्यता लाभली. एकट्याने पदयात्रा केली. यामुळे मला काय लाभले ? व्यावहारिक हिशेबाने तोटाच झाला. जी यात्रा एक आठवड्यात झाली असती त्या यात्रेला ७५ दिवस लागले. ज्या यात्रेला केवळ ३०० ते ४०० रुपये खर्च आला असता त्या यात्रेला रु. ९०० खर्च आला. पादत्राणाचे चार जोड झिजले. उन्हाळ्यामुळे घाम येऊन कपडे खराब होत. ते लवकर फाटत. शारीरिक कष्ट तर अपार होत. पहिला वर्ग, AC वर्ग, विमान यांनी प्रवास करणाऱ्या सुखवस्तू गृहस्थाला पायी प्रवास किती कष्टमय वाटेल याची कल्पनाच केलेली बरी ! शिवाय माझे बोजड शरीर चालले कसे हेच आश्चर्य आहे !

**ईश्वराच्या दर्शनाला देह ऐसा झिजवावा ।**
**मन बुद्धी आणि आत्मा यांचा पूर्ण लोप व्हावा ॥**

जगन्नाथाचा मी भक्त नव्हतो. पंढरीच्या वारकऱ्यांच्या दिंडीची मला सवय नव्हती. ताजमहालासारखे जगन्नाथाचे मंदिर काही सुंदर नव्हते. मग ही पदयात्रा का केली आणि काय मिळाले ?

'बेटा जगन्नाथाला चल' या स्वामींच्या तीन शब्दात विलक्षण सामर्थ्य व विलक्षण माधुर्य होते. 'चल' म्हणजे स्वामी बरोबर असणार हा मनस्वी आनंद ! स्वामींचा साक्षात्कार झाल्यापासून माझे निराळे अस्तित्वच लोप पावले. देही असून विदेहीपण आले व्यवहार असून त्यापासून मुक्त झालो.

**धन पुत्र दारा असू दे पसारा ।**
**परि नको थारा आसक्तीसी ॥**

माझा संसार तर आनंदाचा आहे. मी तृप्त आहे.

**जगी सर्व सुखी असा कोण आहे ?**

या प्रश्नाला मी उत्तर देतो– ' मी आहे ! '

हेच सुख, हाच आनंद सर्वत्र विखुरावा, साऱ्यांचे संसार आनंदाचे व्हावे, याच कामास स्वामींनी मला जुंपले आहे. आनंदाचे वितरण करण्याने तो शतपटीने वाढतो हा वैयक्तिक लाभ होय !

**स्वयें तरोनी जन तारी । ही ज्ञानाची अगाध शिदोरी ।।**
**दिधली मी तुझ्या करी । जन उध्दरीं उध्दवा ।।**

ईश्वराचा साक्षात्कार झाल्यावर काय करावयाचे असते ह्याचे पूर्ण ज्ञान, सत्य ज्ञान या दोन पंक्तीत श्रीकृष्णानी सांगितले आहे.

स्वामींची हाक आली तेव्हाच मला जाणवले की, माझ्याकडून असे तप करून घेण्यात स्वामींचा हेतू फार हृद्य आहे !

माझ्याकडे शेकडो लोकांच्या समस्या आलेल्या असतात. त्या उपासनेने, व्रताने किंवा सत्कर्माने सुटतात. चमत्कार, जडीबुटी असे काही नसते. त्या त्या व्यक्तीने उपासना व आचार केल्याने प्रश्न सुटतात. हा सरळ मार्ग आहे. पण काही समस्या कुटील असतात. ते प्रश्न सुटण्यासाठी स्वामी मजकडून काही तप करून घेतात.

या पदयात्रेमुळे माझ्याकडे ज्यांच्या समस्या होत्या त्यांच्या समस्या सुटल्या. त्यातील काहींचा आढावा पाहू या. पदयात्रा चालू असताना घडलेल्या घटना पहा.

१) २७।२८ पदवीधर (अगदीं १ ला वर्ग) वर्ष–दोन वर्ष बेकार होते. त्या सर्वांना उत्तम नोकऱ्या लागल्या.

२) एक बँक कॅशिअर स्वत: गुन्हा न करिता गुन्हेगार ठरला होता. नोकरी जाऊन संसार उध्वस्त होत होता. तो दोषमुक्त होऊन त्याला बढती मिळाली. संसार बांधला गेला

३) ५ जणांचे दारुचे व्यसन सुटले

४) एका महिलेवर परित्यक्ता होण्याची वेळ आली होती. ती टळून तिचे यजमानांचे स्वभावात बदल झाला. त्यांचे व्यसन सुटले.

५) ८।१० जणांचे दुर्धर रोग बरे झाले.

६) एका मुलीचा ठरलेला विवाह पैशाच्या अवास्तव मागणीमुळे मोडला. तिचा विवाह होऊन चांगले स्थळ मिळाले.

७) परीक्षेत यश तर अनेकांना मिळाले.

८) १३ प्रौढ कुमारिकांचे प्रश्न मजजवळ होते. (वय ३० ते ३९) त्या सर्वांना (त्यांच्या पालकांना) मी यात्रेस निघण्यापूर्वी कळविले होते की, सांगितलेली उपासना व व्रते करीत रहा. माझी पदयात्रा संपावयाच्या आत आपले विवाह होतील आणि त्याप्रमाणे पदयात्रा चालू असतानाच ११ मुलींचे विवाह झाले. एका मुलीचा विवाह ११ जून १९७९ रोजी झाला आणि १३ व्या मुलीचा विवाह जुलैमध्ये झाला.

या सर्व सुखद घटनांमुळे होणारा आनंद कोणत्याही मापाने मोजता येणार नाही. या आनंदाचा लाभ स्वर्गातील सर्व सुखांच्या लाभापेक्षा मोठा आहे. प्रवासात शेतात झोपल्यामुळे मिळत रहाणारा आनंद हा अगाध ज्ञानशक्तीच्या लाभामुळे होत होता. मी ते ज्ञान, तो आनंद अनुभवणे हे महान् भाग्य आहे.

पदयात्रा म्हणजे एक तपश्चर्याच ! ज्यामुळे मृत्यूची भीती दूर होते, आत्म्याचे अमरत्व मनावर ठसते, ईश्वराशी तादात्म्यता होते. देवमाणसे भेटतात. ‘ धंदा मालिकका है ’ असे आकाशाकडे पाहून म्हण-णारा मुन्नतलाल, ‘ बाबा, एक ग्लास लस्सी घ्याल का ?’ असे विचार-णारा सरायपल्लीचा चांभार, ‘ ठाकूर आहे तेथे काय नाही ?’ असे सांगणारा तरुण ! काजूचा शिरा देणारा शत्रूघ्न ! अचानकपूरचा शीख, अडाणी, तळपत्या उन्हात डांबरी रस्त्यावर डोक्यावर ओझे घेऊन ईश्वराची कथा ऐकण्यात तल्लीन झालेल्या भगिनी. ही सारी ईश्वरा-चीच रुपे नाहीत का ? ठायी ठायी ईश्वर प्रगट होत होता. गवताच्या पात्यांवरील दंवबिंदूमध्येही तो प्रकट होत होता. वृक्ष लतांची पाने

फुलेही मला चालण्यास शक्ती देत होती. वायू रिझवीत होता. चंद्र सूर्य आळींपाळीने सोबतीला होते. ज्या भूमीवरून चालत होतो ती तर जगन्माता भारतभूमी मला वत्साप्रमाणे कुशीत घेत होती !

पदयात्रेने मन फार मोठे झाले. अंतःकरण फार मोठे झाले आणि देह लहान झाला. अहंभाव लोप पावण्याची गती सुरू झाली.

**।। मैं नही तूहि ।। हे सत्य प्रगट झाले.**

हे सारे घडवून आणणारे माझे स्वामी ! कुणी त्यांना अक्कलकोटचे महाराज म्हणतात, कुणी त्यांना नृसिंहसरस्वतीचे अवतार मानतात ! ज्याला ते जसे दिसतात तसे तो मानणारच ! ज्या उंचीवरून आपण पहातो तसेच आपणास दिसते. स्वामी म्हणजे आद्य-अनंत व चिरंतन शक्ती असे मी मानतो. सर्व शक्तिमान परमेश्वराचे सगुण रुप !

**पदीं आपुल्या टेकीला फक्त माथा**
**नमस्कार साष्टांग स्वामीसमर्था ।।**

# परिशिष्ट

## ।। श्रीस्वामीसमर्थ ।।

जगन्नाथपुरीला जी ६०।७० पत्रे मला आली त्यात खालील काव्य सौ. नीलिमा राजे, गडहिंग्लज यानी पाठविले होते. यती वगैरे विशेषणे मला योग्य नाहीत पण काव्यांत अतिशयोक्ती हा एक अलंकार असावा ! मात्र पदयात्रेत मी अगदी प्रसन्न होतो हे खरे ! डॉ राजे यांना १-२ पत्रे प्रवासांत लिहिली होती. त्यावरील कल्पनाशक्ती–प्रतिभा यांचा अविष्कार सौ. नीलिमाताईंचा ! मला वाटते माझ्या लेखनापेक्षा या काव्यानेच आपणांस आनंद होईल. यास्तव आपणा सर्वांमार्फत त्यांना धन्यवाद देतो.

**भु. म. करंदीकर**

## ।। वाचकहो, काव्यास शीर्षक आपणच द्या ।।

जनसेवेचे बांधून कंकण ।
आयु वेचिले अपुले कणकण ।
आणि तयावर प्रसन्न होऊनि ।
स्वामी आज्ञापिती । निघाला पदयात्रेला यती ।। १ ।।

मनीं चालले अखंड चिंतन ।
प्रेमाश्रूंनी भिजती लोचन ।
सुखासीनता दूर सारुनी ।
रमला सेवाव्रती । निघाला पदयात्रेला यती ।। २ ।।

तेज विलसते सुहास्य वदनीं ।
कृतार्थ जीवन तृप्तता मनीं ।
प्रेमरसातचि निघे न्हाउनी ।
जनकल्याणी रती । निघाला पदयात्रेला यती ।। ३ ।।

कौपिनेश्वरा हात जोडिले ।
रामनाम मुखि सहजचि आले ।
मस्तक टेकुनि लोचन मिटले ।
अष्टभाव दाटती । निघाला पदयात्रेला यती ।। ४ ।।

सगे सोयरे सारे जमले ।
निरोप देण्या आप्ताहि आले
सुहृद सदिच्छा घेऊनी मनीं ।
येती सांगाती । निघाला पदयात्रेला यती ।। ५ ।।

प्राचीला अरुणोदय झाला ।
गंधित वारा वाहुं लागला ।
वृक्ष वल्लरी वायुसंगे ।
मुदित मने डोलती । निघाला पदयात्रेला यती ।। ६ ।

दही घालुनी हातावरती ।
मित्र मंडळी निरोप देती ।
श्रीरामाचे नांव घेउनी ।
पायवाट चालती । निघाला पदयात्रेला यती ।। ७ ।।

वरद हस्त स्वमींचा लाभे ।
जगज्जननी हळुं कानीं सांगे ।
लोकमानसी देव शोध तूं ।
मग भेटे श्रीपती । निघाला पदयात्रेला यती ।। ८ ।।

भार जयाचा समर्थांवरी ।
चिंता त्याला स्पर्शाही न करी ।
लोभ मोह जिंकियले त्याने ।
आत्मभाव लोपती । निघाला पदयात्रेला यती ।। ९ ।।

स्वामींचे सान्निध्य लाभले ।
भय न कशाचे चित्तीं उरले ।
महत्कार्य हे हातीं घेतले ।
करण्या जन जागृती । निघाला पदयात्रेला यती ।। १० ।

भाजी भाकरी झोपडीतली ।
अमृताहुनी गोड लागली ।
गरिबांचा प्रेमाग्रह बघुनी ।
लोचन पाणावती । निघाला पदयात्रेला यती ।। ११ ।।

काळी आई कुशीत घेते ।
नील नभाची शाल घालते ।

झुळुझुळु वहात जललहरी या ।
अंगाई गाती । निघाला पद्यात्रेला यती ।। १२ ।।

आईच्या अंकावर निजतो ।
बाळ तान्हुला झोपी जातो ।
शीतल वारा मंद वाहतो ।
हळू तया थोपटी । निघाला पद्यात्रेला यती ।। १३ ।।

शुभप्रभाती प्रसन्न चित्ती ।
पक्षीगण हे किलबिल करिती ।
वारे जणू भूपाळी गाऊनी ।
जगास जागविती । निघाला पद्यात्रेला यती ।। १४ ।।

देवमाणसे किती भेटती ।
आवर्जुनीया घरास नेती ।
पळभर घेऊनी तिथे विसावा ।
पुढे निघे यात्री । निघाला पद्यात्रेला यती ।। १५ ।।

क्षण विश्रांतीसाठी बसता ।
कुटुंबियांचा आठव होता ।
अभिमानाने ऊर दाटतो ।
नसे व्यथा त्यामधी । निघाला पद्यात्रेला यती ।। १६ ।।

शासन करण्या दुष्ट जनांना ।
आणी रक्षावया सज्जना ।
ईश्वर घेतो अवताराला ।
या भारत भूमधी । निघाला पद्यात्रेला यती ।। १७ ।।

पुरीत बसला जगन्नाथ तो ।
दीन जनांना तो उद्धरितो ।
पूर्वतटीचा भाग्यसूर्य तो ।
येईल पश्चिम तटी । निघाला पद्यात्रेला यती ।। १८ ।।

हृदयमंदिरी मूर्ति स्थापिली ।
सत्कर्मांची फुले उधळली ।


नेत्रांच्या दीपात तेवती ।
    भक्तीच्या ज्योती । निघाला पद्यात्रेला यती ॥ १९ ॥

राउळातला जगन्नाथ तो ।
सामोरा धावतची येतो ।
प्रेमे आलिंगनही देतो ।
    भेटुनि भक्ताप्रती । निघाला पद्यात्रेला यती ॥ २० ॥

पद्यात्रेची होय सांगता ।
ठेऊनि चरणावरती माथा ।
अभिसिंचन समचरणावरती ।
    प्रेमाश्रु करिती । निघाला पद्यात्रेला यती ॥ २१ ॥

सौ. निलिमा राजे; गडहिंग्लज

REFBK-0025252


1. THANE
2. BHIWANDI
3. IGATPURI
4. NASIK
5. PIMPALGAON
6. CHANDVAD
7. MALEGAON
8. DHULE
9. PEROLA
10. ERANDOL
11. JALGAON
12. BHUSAWAL
13. MALKAPUR
14. NANDURA
15. KHAMGAON
16. BALAPUR
17 AKOLA
18 MURTIJAPUR
19 KHERDA
20. BADNERA
21. AMRAVATI
22 TALEGAON
23. KANDHALI
24. NAGPUR
25. BHANDARA
26. SAKOLI
27 DEORI
28. CHICHOLA
29. RAJNANDGAON
30. DURG
31. RAIPUR
32. GHORARI
33. PITHORA
34. BASNA
35. SARAIPATI
36. SOHELA
37. BARGARH
38. SAMBALPUR
39. MANESAR
40. RAMPUR
41. LAKICH
42. NUNKAPASI
43. ANGUL
44. DHENKANAL
45. CUTTACK
46. BHUBANESWAR
47. PIPLI
48. PURI
A. HIRAKUD DAM
B. CHILKA LAKE.
C. KARANJA